# सार्थ ज्ञानेश्वरी
## अध्याय चौदावा

जय जय आचार्या । समस्तसुरवर्या ।
प्रज्ञाप्रभातसूर्या । सुखोदया ॥ १ ॥

अहो आचार्य ! तुमचा जयजयकार ! तुम्ही सकल देवांत श्रेष्ठ आहांत.
प्रज्ञारूप प्रभात करणारे सूर्य आणि सर्व आत्मसुखाचा उदय करणारे आहात,

जय जय सर्वविसांवेया । सोहंभावसुहावेया ।
नाना लोक हेलावया । समुद्रा तूं ॥ २ ॥

तुम्ही सर्व जगास विश्रांतिस्थान असून सर्वांच्या हृदयांत अहंब्रह्म हें तत्त्व घालणारे
आहांत; अनेक लोकरूपी लाटांचे समुद्र आहांत; अशा तुमचा जयजयकार करतों.

आइकैं गा आर्त्तबंधू । निरंतरकरुणासिंधू ।
विशदविद्यावधू- । वल्लभा जी ॥ ३ ॥

तुम्ही दीनदयाळ असून निरंतर कारुण्यरसाचे समुद्र
आणि ब्रह्मविद्यावधूचे वर आहांत. तरी तुम्ही ऐका.

तूं जेयाप्रति लपसि । तेया जग हें दाविसि ।
प्रकट तैं करिसि । आघवें तूं ॥ ४ ॥

तुम्ही ज्यांच्या दृष्टीस पडत नाहीं, त्यांना हें सर्व विश्व खरें भासतें;
तुम्ही ज्यांना प्रकट होता त्यांना सर्वत्र तुमचाच प्रत्यय येतो

पुढिलां तरि चोरिजे । हा दृष्टिबंधु निफजे ।
नवल लाघव तूझें । जें आपणपें चोरे ॥ ५ ॥

नजरबंद खेळात गारोडी दुसऱ्याची दृष्टी चोरतो, पण हे श्रीगुरो भगवंता !
तुमचें अद्भुत कौशल्य असें आहे, कीं तुम्ही आपल्याच स्वरूपाला लपवितां !

जें तूं चि तूं सर्वां एया । कवणा बोधु कवणा माया ।
ऐसें आपें आपु लाघविया । नमो तुज ॥ ६ ॥

पण हे श्रीगुरो ! तुम्हीच या विश्वाचें सर्वस्व आहां; मग एकाला माया भासावी, आणि
एकाला आत्मबोध घडावा, असा तुमचा सहज खेळ सुरू आहे. तुम्हांला नमस्कार असो.

जाणों जगीं आप बोलें । तें तुझिया बोला सुरस झालें ।
तूझेनि क्षेमत्व आलें । पृथ्वियेसि ॥ ७ ॥

जगात पाणी जे ओलेपणाने दिसते, तें तुझ्या ओलेपणाने चांगले द्रवयुक्त
झालें आहे; पृथ्वीला क्षमागुणाची जोड तुमच्यापासूनच मिळाली आहे.

रविचंद्रादि शूक्ति । उदो करितां त्रीजगति ।
तें तुझिया दीप्ती । तेज तेजां ॥ ८ ॥

रवी, चंद्र इत्यादी शिंपले सगळे विश्व प्रकाशमान
करतात, तो तुमच्या तेजाच्याशक्तीचा प्रभाव आहे.

चळबळिजे अनिळें । तें देविकेनि जी बळें ।
नभ तुजमाजि खेळे । लपींथपीं ॥ ९ ॥

वाऱ्याचा चंचलपणा हेंही तुमचेंच दिव्य सामर्थ्य होय,
आकाश आपल्या स्वरूपामध्यें लपंडाव खेळत असतें.

किंबहुना माया असोस । ज्ञान तुझेनि डोळस ।
असो वानणें सायास । श्रुतिसि हें ॥ १० ॥

फार काय सांगावे ? मायेचे अमर्यादपण आपणांमुळें, व ज्ञानालाही डोळसपणा
तुमच्यामुळेच मिळतो. तुमचे गुणवर्णन करणे वेदालाहि कठीण आहे.

वेद जें वानूनि चांग । जंव न दिसे तूझें आंग ।
मग आह्मा तेया मूग । एकी पांती ॥ ११ ॥

जों पर्यंत तुझ्या स्वरूपापर्यंत पोंचला नाहीं, तोपर्यंत वेद वर्णन करून प्रतिष्ठेंत राहतो; परंतु तेंच आपलें दर्शन झाल्यावर वेद व आम्ही दोघेहि एका मौनाच्या पंक्तीतच बसतो.

जी एकार्णवाचां ठांइं । पाहातां थेंबाचा पाडु नाहीं ।
मग महानदी काई । जाणिजती ॥ १२ ॥

अहो, प्रलयकाळच्या महासमुद्रांत थेंबाचा पत्ता लागत नाहीं, तेथें महा नदीचा शोध लागण्याची गोष्टच नको.

कां उदैलेयां भावस्तु । चंद्र जैसा खद्योतु ।
आह्मा श्रुती तुजआंतु । तेतुला पाडु ॥ १३ ॥

अथवा सूर्य उगवल्यावर जसा चंद्र हा काजव्यासारखा, फिका पडतो, त्याच प्रमाणे तुमच्या आत्मस्वरूपांत आमची व वेदाची अवस्था होते.

आणि दूजेया थाउ मोडे । जेथ परेसिं वैखरी बुडे ।
आणि तूं मां कवणें तोंडें । वानावासि ॥ १४ ॥

आणि ज्या ठिकाणी द्वैतभाव मोडून वैखरी वाचाही परावाणीसह जेथें नाहींशी होते, त्या तुझ्या स्वरूपाचे कोण्या मुखाने वर्णन करता येणार ?

येयालागि आतां । स्तुति सांडुनि निवांता ।
चरणीं ठेविजे माथा । हें चि भलें ॥ १५ ॥

यास्तव आतां तुमची स्तुती करण्याचें सोडून मुकाट्यानें तुमच्या चरणांवर मस्तक ठेवावें हेंच चांगलें.

तरि तूं जो होसि तेया । नमो श्रीगुरुराया ।
मज ग्रंथउद्यमु फळावेया । वेव्हारा होईं ॥ १६ ॥

हे सद्गुरुराया ! तुम्ही जसे आहांत तशाच तुम्हांला मी नमस्कार करतों, माझा ग्रंथरूप व्यापार सफल होण्यास आपण साकार व्हा.

आतां कृपाभांडवल सोडीं । भरिं मति माझी पोतडी ।
करीं ज्ञानपदजोडी । थोर मातें ॥ १७ ॥

आता माझ्याकरिता आपले कृपारूप भांडवल मोकळे करा आणि तें माझ्या बुद्धीरूपी खोळींत टांका आणि मला ज्ञानपदाचा लाभ करून द्या.

मी संवसरेनि तेणें । संतांसि करीं कर्णभूषणें ।
लेववीन सुलक्षणें । विवेकाचीं ॥ १८ ॥

मग मी त्या योगानें सांवरेन व संतांना उत्तम लक्षणे असलेली विवेकांची सुंदर कर्णभूषणें करून घालीन.

जी गीतार्थु निधान । काढू माझें मन ।
सुईं स्नेहांजन । आपुलें तूं ॥ १९ ॥

हे श्रीगुरुराया ! गीतार्थरूपी ठेवा शोधण्यास माझे मन समर्थ व्हावें, यासाठी तुम्ही स्नेहरूपी अंजन माझ्या डोळ्यांत घाला.

हे वागश्रृष्टि येकें वेळें । देखति बुद्धिचे डोळे ।
तैसा उदैजो निर्मळें । कारुण्यबिंबें ॥ २० ॥

माझ्या बुद्धीचे डोळे एकाच वेळेला शब्दमय सृष्टी पाहतां येईल, अशा तऱ्हेचा आपल्या कल्याणरूप सूर्यबिंबाचा निर्मळ प्रकाश पाडा.

माझी प्रज्ञावेलिवें वेल्हाळ । काव्यें होंति सुफळ ।
तो वसंतु होईं स्नेहाळ- । शिरोमणी ॥ २१ ॥

हे कृपाळुश्रेष्ठा श्रीगुरो, ज्याच्या प्रभावानें माझ्या बुद्धीरूपी सुदंर वेलीला काव्यरूपी फळे लटकतील, असा वसन्त ऋतू आपण व्हा.

प्रमेयमहापुरें । हें मतिगंगा भरे ।
तैसा वरिष उदारें । दिठिवेनि ॥ २२ ॥

आपल्या उदार कृपादृष्टीचा असा वर्षाव करा, कीं माझ्या बुद्धिरूपी गंगानदीला तत्त्वसिद्धांताच्या लोंढ्यानें अर्थरूपी महापूर यावा.

आगा विश्वैकधामा । तूझा प्रसादु चंद्रमा ।
करू मज पूर्णिमा । स्फूर्त्तीची जी ॥ २३ ॥

अहो विश्वाचे एकमेव आश्रयस्थान असणाऱ्या गुरुवर्या ! आपला प्रसादचंद्रमा मला स्फूर्तीची पौर्णिमा करो,

जिया पाहिलें मातें । उन्मेखसागरिचें भरितें ।
चोसंडैल तें । रसवृत्तीचें ॥ २४ ॥

महाराज, आपण माझ्याकडे कृपादृष्टीनें पाहिलें असतां, ज्ञानसमुद्रावर उठणाऱ्या स्फर्तीला भरतें येईल; आणि नवरस हे स्फूती भरून सांडू लागतील !

तंव तोखौनि गुरुराजें । ह्मणितलें विनतिव्याजें ।
मांडिलें देखों दुजें । स्तवनमिसें ॥ २५ ॥

तेव्हां संतुष्ट होऊन श्रीगुरुराया म्हणाले, कीं या विनंतीचें निमित्त करून मी-तूं असें द्वैत निर्मिलें आहेस.

हें असो आतां वाजटा । तो ज्ञानकर्पूरगोमटा ।
ग्रंथु दावीं उत्कंठा । भंगों नेंदीं ॥ २६ ॥

तर आतां ही व्यर्थ स्तुती राहू दे; गीताग्रंथातील ज्ञानाचा विषय लवकर स्पष्ट करून सांग. श्रोत्यांची ऐकण्याविषयीं उत्कट इच्छा मोडूं देऊं नकोस.

हो कां जी जी स्वामी । हें चि पाहांतु असें मीं ।
जें श्रीमुखें ह्मणां तुह्मीं । ग्रंथु सांघें ॥ २७ ॥

ज्ञानेश्वर म्हणतात-स्वामी ! अशी का आपली इच्छा आहे ? मी याचीच वाट पाहातो की तुम्ही स्वतः मला ग्रंथ सांग अशी आज्ञा केव्हा देता !

सहजीं दूर्वेचा हीरु । आंगे चि तंव अमरु ।
वरि आला महापूरु । पीयूषाचा ॥ २८ ॥

आधींच दुर्वेचा अंकूर आपल्या अंगेंच अमर, तशात त्याच्यावर अमृताचा लोंढा यावा, त्यांतलाच हा प्रकार आहे.

तरि आतां एणें प्रसादें । विन्यासें विदग्धें ।
मूळशास्त्रपदें । वाखाणीन ॥ २९ ॥

तरी आतां या कृपाप्रसादामुळें गीतेतील मूळ पदांचे साहित्यअलंकारांनी युक्त असे मी प्रतिपादन करीन.

परि जीवा आंतुलीकडे । जैसी संदेहडोणी बुडे ।
मग श्रवणचाडे । आवडी दीसे ॥ ३० ॥

ज्या रीतीने जीवाच्या अंतःकरणातील संशयाची नौका बुडून जाईल, आणि मग श्रवणाविषयींची आवड वाढीला लागेल.

तैसा बोलीं साचारीं । अवतरो माझी माधूरी ।
मालें मागैन घरीं । गुरुकृपेचां ॥ ३१ ॥

तसे खरोखर मधूर बोलच माझ्या मुखातून निघावे, त्यामुळें माझ्या भाषणांत त्या प्रकारची खरी खरी गोडी प्रकट होवो.

तरि मागां त्रयोदशीं । अध्याइं गोठि ऐसी ।
जें श्रीकृष्णु अर्जुनेंसीं । संवादलें ॥ ३२ ॥

तर मागें तेराव्या अध्यायांत श्रीकृष्णांनीं अर्जुनास असें कथन केलें, कीं.

जें क्षेत्रक्षेत्रज्ञयोगें । होइजे येणें जगे ।
आत्मा गुणसंगे । संसारिया ॥ ३३ ॥

क्षेत्र व क्षेत्रज्ञ यांच्या संयोगाने हे सर्व जगत् उत्पन्न होते
आणि गुणांचा संग घडल्याकारणांने आत्मा संसारी बनतो.

आणि हा चि प्रकृतिगतु । सुखंदुःखभोगीं हेतु ।
अथवा गुणातीतु । केवळु हा ॥ ३४ ॥

आणि हाच प्रकृतीच्या तावडींत गेल्याकारणांनें सुखे व दुःखे
भोगण्यास कारण होतो, एरवीं हा तर केवळ गुणांपलिकडील आहे.

तरि कैसा यां असंगा संगु । कोणु तो क्षेत्रक्षेत्रज्ञयोगु ।
सुखदुःखादि भोगु । केवि तेया ॥ ३५ ॥

तर संगरहित असा जो आत्मा, त्याला प्रकृतीचा संग कसा होतो, व क्षेत्रक्षेत्रज्ञ
यांमधील संबंध तो कोणता ? आणि त्याला सुखदुःखांचे भोग कसे होतात ?

गुण ते कैसे केती । बांधति कवणां रीती ।
नातरि गुणातीतीं । चिन्हु काई ॥ ३६ ॥

गुण ते कसे व किती आहेत त्यांचे स्वरूप काय, व ते बंधक
कसे होतात ? गुणातीत अशा मनुष्याची लक्षणे कोणती ?

एवं येया आघवेया । अर्था रूप करावेया ।
विषो एथ चौदावेया । अध्यायासि ॥ ३७ ॥

या सर्व प्रश्नांचा नीट उलगडा करणें, हा येथें
चौदाव्या अध्यायाचा प्रतिपाद्य विषय आहे.

तरि तो चि आतां ऐसा । प्रस्ततु परियसां ।
अभिप्राॐ विश्वेशा । वैकुंठाचा ॥ ३८ ॥

तर आतां त्या वैकुंठनिवासी विश्वेशांचा
अभिप्राय काय आहे, ते श्रवण करा.

श्रीभगवानुवाच -
परं भूयः प्रवक्ष्यामि ज्ञानानां ज्ञानमुत्तमम् ।
यज्ज्ञात्वा मुनयः सर्वे परां सिद्धिमितो गताः ॥ १ ॥

परम्, भूयः, प्रवक्ष्यामि, ज्ञानानाम्, ज्ञानम्, उत्तमम्,
यत्, ज्ञात्वा, मुनयः, सर्वे, पराम्, सिद्धिम्, इतः, गताः

श्रीभगवान म्हणाले, ज्ञानांतीलही उत्तम ते परम ज्ञान मी तुला पुन्हा सांगतों.
व जे प्राप्त करून घेऊन सर्व मुनी या देहापासून सुटून परम सिद्धीलां प्राप्त झाले,

तो ह्मणे गा अर्जुना । अवधानांची सर्व सेना ।
मेळउनियां ज्ञाना । झोंबावें हो ॥ ३९ ॥

भगवान श्रीकृष्ण म्हणतात, हे अर्जुना, अवधानरूपी
सर्व सेना एकत्र करून या ज्ञानाला ग्रहण केले पाहिजे.

आह्मीं मागां बहुतिं । दाविलें तुज उपपत्तीं ।
आझुइं प्रतीती । कुंसि न निगे ॥ ४० ॥

आम्ही तुला मागें अनेक युक्तिवाद करून हा विचार तुला सांगितला
आहे, तरी अद्याप त्याचा प्रत्यय तुझ्या मनांत बिंबत नाहीं.

ह्मणौनि गा पुडुतीं । सांधिजैल प्रतिपत्ती ।
परि ह्मणह्मणों श्रुती । डाहारिजे जें ॥ ४१ ॥

म्हणून श्रुतीने जे ज्ञान आपल्या मर्यादेपलीकडे आहे असे
वारंवार म्हटले आहे, तें ज्ञान तुला पुन्हा सांगण्यात येईल.

एऱ्हवीं ज्ञान हें आपुलें । परि पर हें ऐसें जालें ।
जें आवडौनि घेतलें । भवस्वर्गादि एणें ॥ ४२ ॥

खरोखर ज्ञान हे आपले आत्मस्वरूप होय. परंतु इहलोक स्वर्ग लोक यांविषयीं मनीं प्रीत उपजल्यामुळें ते परकें या संज्ञेस पावतें झाले.

एणें चि गा कारणें । हें सर्वां उपरि मीं ह्मणें ।
तें वन्हि इयें तृणें । ऐरें ज्ञानें ॥ ४३ ॥

म्हणून मी या ज्ञानाला सर्वांपेक्षा श्रेष्ठ ज्ञान म्हणतो. कारण हें अग्निरूप असून इतर ज्ञानें तृणरूपी आहेत.

जियें स्वर्गादि तें जाणति । याग चि चांग ह्मणति ।
पारखि फुडी आथि । भेदीं जेयां ॥ ४४ ॥

जीं ज्ञानें मृत्युलोक व स्वर्गलोक यांना खरे मानतात, व यज्ञच चांगले असें म्हणतात व ज्याला द्वैताशिवाय दुसऱ्या कशाची ओळख नसते,

तियें आघवीं चि ज्ञानें । केली ऐणें स्वप्नें ।
जैसें वातोर्मि गगनें । गीळिले आथि ॥ ४५ ॥

तीं सर्व ज्ञानें आत्मज्ञानापुढें स्वप्नवत भासतात. गगनात जसा वारा विलीन होतो तसे हे होते.

कां उदितें रश्मिराजें । लोपलीं चंद्रादि तेजें ।
नाना प्रळयांबुमाजें । नदीनद ॥ ४६ ॥

किंवा सूर्य उगवला म्हणजे चंद्रादि तेजें जशीं फिकीं पडतात, अथवा प्रळयकाळच्या पाण्याच्या महापुरानें जसे नदी व नद नाहींसे होतात.

तैसें हें पाहालेया । अज्ञानजात जाये लया ।
ह्मणौनि धनंजया । उत्तम हें ॥ ४७ ॥

त्याप्रमाणें आत्मज्ञानाचा उदय झाल्यावर इतर सर्व ज्ञानें लय पावतात. म्हणून अर्जुना, हें ज्ञान उत्तम समजावें.

अनादि जे मुक्तता । आपुली जे पांडुसुता ।
तो मोक्ष हाताइता । होये जेणें ॥ ४८ ॥

अर्जुना, आपली जी अनादि स्वयंसिद्ध मुक्तस्थिती, जिला तो मोक्ष यामुळें आपणांस हस्तगत होतो.

येयाचिया प्रतीती । विचारचिरिं समस्तीं ।
नेंदिजे चि संशृती । माथा उधों ॥ ४९ ॥

त्या या ज्ञानाचा अनुभव आला असतां, विवेकी माणसे मोक्ष म्हणतात; संसाराला डोके वर काढूं देत नाहींत.

मनें मन घालूनियां मागें । विश्रांति जालेयां आंगें ।
देहिं देहाजोगे । होती चि ना ॥ ५० ॥

मनानें मनाचा निग्रह करून जे स्वयमेव विश्रांतिरूप झाले, ते देहधारी असले, तरी देहाच्या अधीन होत नाहींत.

मग देहाचें बेळें । ॲलांडूनि येकें वेळें ।
समतूकीं काटाळें । मसीं जाले ॥ ५१ ॥

मग देहाचे देहामधले संघर्ष एकदम जाऊन तुलनेत ते पुरुष माझ्या बरोबरीचे होतात.

इदं ज्ञानमुपाश्रित्य मम साधर्म्यमागताः ।
सर्गेऽपि नोपजायन्ते प्रलये न व्यथन्ति च ॥ २ ॥

इदम्, ज्ञानम्, उपाश्रित्य, मम, साधर्म्यम्, आगताः,
सर्गे, अपि, न, उपजायन्ते, प्रलये, न व्यथन्ति, च

हे ज्ञान धारण करून माझ्या सायुज्याला प्राप्त झालेले, पुरुष सृष्टी
निर्माणकालीं जन्म पावत नाहींत, आणि प्रलयकालीं व्यथित होत नाहींत

जे माझिया नित्यता । नित्य ते पांडुसुता ।
परिपूर्ण पूर्णता । माझिया चि ॥ ५२ ॥

हे अर्जुना ! जे माझ्या नित्यपणामुळे नित्यत्व पावले
आहेत, व माझ्याच परिपूर्णतेनें ते परिपूर्ण आहेत.

मी जैसा अनंतानंदु । जैसा चि सत्यसिद्धु ।
तैसा चि तेया भेदु । उरे चि ना ॥ ५३ ॥

ज्याप्रमाणे मी अमर्याद ब्रह्मानंदस्वरूप व सत्यसिद्ध असतों,
तसेच तेही असतात. आमच्यामध्यें कोणताही भेद उरत नाहीं.

जें मीं जेवडें जैसें । ते चि ते जाले तैसें ।
घटभंगीं घटाभासें । आकाश जेवि ॥ ५४ ॥

माझें स्वरूप जेवढें व जसें असतें, तेवढेंच व तसेंच त्यांचेही असतें.
ज्याप्रमाणे घट फुटला असता त्यातील आकाश महदाकाश होऊन जाते,

नातरि दिवा मुकुळिकीं । दीपशिखा अनेकि ।
मीनलेयां अवलोकीं । जैसें होये ॥ ५५ ॥

किंवा एक मूळ दिव्यापासून लावलेल्या अनेक दीपज्योती
एकत्र केल्या म्हणजे त्या मूळ दिव्यांतच तेज मिळतें;

अर्जुना तियापरीं । सरली द्वैताची वारी ।
नांदो नामार्थ एकाहारी । आह्मीं ते ही ॥ ५६ ॥

अर्जुना, त्याप्रमाणें त्यांची द्वैताची वारी सरली. नामाचा अर्थ जें रूप,
तिथे एकाच पंक्तीला मी व तू अशा द्वैतभावाशिवाय नांदत आहोंत.

एणें चि पैं कारणें । जैं पाहिलें शृष्टिजुंपणें ।
तैं तेयां होणें । पडे चि ना ॥ ५७ ॥

या कारणामुळेच जेव्हा पुन्हा कल्पारंभी सृष्टी उत्पन्न
होते तेव्हांही त्यांस जन्मास यावें लागतच नाहीं.

सृष्टिचिये सर्वादी । जेयां देहाची नाहिं बाधीं ।
तें कैंचे प्रळयाधी । निमतील पां ॥ ५८ ॥

मग, कल्पाच्या आरंभी उत्पन्न होणाऱ्या सृष्टीत ज्यांना देहाची
बाधा होत नाहीं, ते प्रलयकाळी विलयास कसे जातील ?

ह्मणौनि जन्मक्षयां । अतीत ते धनंजया ।
मी जालां ज्ञाना येया । अनुसरौनि ॥ ५९ ॥

म्हणून धनंजया, ते या अत्मज्ञानाचा आश्रय करून मद्रूप झाले आहेत,
ते जन्ममृत्यूच्या परंपरे पलीकडे जाऊन माझ्या रूपांत विलीन होतात.

ऐसी ज्ञानाची गोडी । वानिली देवें आवडी ।
तेविं चि पार्था सिचडी । लावावेया ॥ ६० ॥

अशा ज्ञानाचा महिमा वर्णन करणें देवास प्रिय असल्यामुळें व
तशीच पार्थासही आत्मज्ञानाची आवड उत्पन्न व्हावी, हाही हेतू होता.

तंव तेया जालें आन । सर्वांगिं निगाले कान ।
सपाई अवधान । पातला तो ॥ ६१ ॥

तों इकडे अर्जुनाची कांहीं विलक्षणच अवस्था झाली ! त्याच्या
सर्व अंगाला कान फुटले. तो अवधानाची केवळ मूर्तीच बनला.

आतां देवाचेया ऐसें । जाकळिजत वोरसें ।
निरूपण आकाशें । वेंटाळे ना ॥ ६२ ॥

आतां देवांसारख्या सर्वज्ञाकडून प्रकटत असलेलें व्याख्यान अर्जुन ग्रहण करू लागला. म्हणून निरूपण आकाशालाही कवळेना, असें अपार झालें.

तो ह्मणे गा प्रज्ञाकांता । आजि उजळली वक्तृता ।
जें बोला एवडा श्रोता । जोडलासि ॥ ६३ ॥

मग श्रीकृष्ण म्हणाले, कीं हे प्रज्ञेच्या पते, आज माझे वक्तृत्व फळास आले म्हणायचे ! कारण माझ्या वाणीच्या तोलाचा असा श्रोता तूं आज मला मिळालास.

तरि एकु मीं अनेकीं । गोविजे देहपाशकीं ।
त्रिगुणलुब्धकीं । कवणी परीं ॥ ६४ ॥

तर आता मी एकच अद्वैतरूप असताना हे त्रिगुणरूपी पारधी, मला देहाच्या पाशांत कसें गुंतवितात ?

कैसा क्षेत्रयोगें । विये येणें जगें ।
तें परियस सांघों वेगें । कोण आतां ॥ ६५ ॥

क्षेत्राशीं संयोग होऊन मी हीं जगें कशीं प्रसवतों, व कसा प्रसवतों तें सांगतों, ऐक.

पैं क्षेत्र येणें व्याजें । हें या चि लागि बोलिजे ।
जें मत्संगबीजें । भूतीं पिके ॥ ६६ ॥

माझ्या संगरूपी बीजापासून अनेक प्राणिमात्र उत्पन्न होतात, याच कारणामुळें याचा क्षेत्र या नावानें उल्लेख केला जातो.

मम योनिर्महद्ब्रह्म तस्मिन्गर्भं दधाम्यहम् ।
संभवः सर्वभूतानां ततो भवति भारत ॥ ३ ॥

मम, योनिः, महत्, ब्रह्म, तस्मिन् गर्भम्, दधामि अहम्,
संभवः, सर्वभूतानाम्, ततः, भवति, भारत

हे अर्जुना, माझी महत् ब्रह्मरूप मूळ प्रकृती ही माझे सृष्टीचें बीज ठेवण्याचे ठिकाण आहे. आणि तिच्यामध्यें मी बीज ठेवतों, त्या पासून सर्व भूतांची उत्पत्ती होते.

आणि महद्ब्रह्म । हें इये ऐसें नाम ।
जें महदादिविश्राम- । शालिका हे ॥ ६७ ॥

ही माया महत्तत्त्वादिकांचें मूळ स्थान असल्यामुळें ह्या प्रकृतिमायेला मदब्रह्म असें नाव आहे

विकारां बहुसै थोरि । अर्जुना हे चि करी ।
ह्मणौनि अवधारीं । हें महद्ब्रह्म ॥ ६८ ॥

अर्जुना, हिच्या योगानें विकार व गुण हे वृद्धी पावतात. म्हणून हें महद्ब्रह्म आहे असें समज.

अव्यक्तवादमती । अव्यक्त ऐसी वदंती ।
सांख्याचिया प्रतीती । प्रकृति हे चि ॥ ६९ ॥

अव्यक्त मतवाद्यांच्या मतें हिला अव्यक्त असें नाव आहे; व सांख्यांच्या अनुभवाप्रमाणें यालाच प्रकृती असें म्हणतात.

वेदांतीं यातें माया । ह्मणिजे प्रज्ञाराया ।
केती बोलों वायां । अज्ञान हें गा ॥ ७० ॥

हे प्रज्ञाशिरामणे, वेदान्तामध्यें यालाच माया म्हणतात, हे पुरे झाले ! थोडक्यात सांगायचे म्हणजे यालाच अज्ञान हे नाव आहे.

आपुला आपणेयां । विसरु जो धनंजया ।
तें गा रूप येया । अज्ञानासि ॥ ७१ ॥

हे धनंजया, आपल्या आत्मस्वरूपाचा आपल्यास
जो विसर पडतो, तेंच या अज्ञानाचें रूप आहे.

आणिक ही येक असे । जें विचारा वेगळें न दिसे ।
वाती पाहातां जैसें । आंधारें कां ॥ ७२ ॥

या अज्ञानाचा आणखी एक स्वभाव असा आहे कीं, कीं जसा दिवा लावून पाहिला
असतां अंधारदिसत नाही त्याप्रमाणे आत्मस्वरूपाचा विचार केला कीं, तें दिसेनासें होतें.

हालविलेयां जाये । निश्चळ तरि राहे ।
दुधीं जैसी साये । दूधा चि तव ॥ ७३ ॥

जशी दुधावरली साय दूध निश्चल असतां दिसते,
पण दूध हलविल्याबरोबर ती दुधात मिळून जाते.

पैं जागरु ना स्वप्न । स्वरूप ना अवस्थान ।
ते सुषुप्ति घन । जैसी होये ॥ ७४ ।

किंवा मनुष्य ज्या वेळेस जागृत अवस्थेंत अथवा स्वप्नावस्थेंत
नसतो, अथवा स्वरूपस्थितीला नाहीं, अशी गाढ सुषुप्ती जशी असते;

कां न वियतां वायुतें । वांझें आकाश रीतें ।
तेया ऐसें निरुतें । अज्ञान गा ॥ ७५ ॥

किंवा वायूचे संचरण नसलें म्हणजे ज्याप्रमाणें आकाश
निःसत्त्व असतें, त्याप्रमाणेंच या अज्ञानाचा प्रकार आहे.

पैलु खांबु कां पुरुष । ऐसा निश्चयो नाहिं येकु ।
काइ नेणों अवलोकु । देखतसे ॥ ७६ ॥

पलीकडे दिसत आहे तो खांब आहे का पुरुष आहे,
याचा संभ्रम पडतो पण नुसता भास दिसतो.

तेवि वस्तु जैसें असे । तैसें किर न दिसे ।
परि काहिं अनारिसें । देखिजे ना ॥ ७७ ॥

त्याप्रमाणे ब्रह्मवस्तू जशी आहे तशी तर दिसत
नाही आणि विपरीत वेगळे असेही काही दिसत नाही.

ना राति ना तेज । तिये संधी जैसी सांज ।
तेवि विरुद्ध ना नीज । ज्ञाना आथि ॥ ७८ ॥

रात्र नाही, उजेड नाही, त्या संधीला जसे सांजवेळ म्हणतात, त्या प्रमाणें
विपरीत ज्ञान नसतें अथवा स्वरूपज्ञान नसतें, तर केवळ अज्ञान असते.

ऐसी कोण्ही येकि दशा । तिये वादु अज्ञान ऐसा ।
तिया गुंडाळलिया प्रकाशा । क्षेत्रज्ञु नांव ॥ ७९ ॥

अशी ही सत्य ज्ञान व विरुद्ध ज्ञान या दोहोंच्या मधली संदेहावस्था, तिला अज्ञान
असे म्हणतात आणि या अज्ञानांत गुरफटलेल्या आत्मतत्त्वालाच क्षेत्रज्ञ हें नांव आहे.

अज्ञान थोरिये आणिजे । आपणपें तरि नेणिजे ।
तें रूप जाणिजे । क्षेत्रज्ञाचें ॥ ८० ॥

अज्ञानाची वाढ करावी आणि आत्मस्वरूपाला
विसरावें, तें क्षेत्रज्ञाचे स्वरूप जाणावें.

हा चि उभययोगु । बुझैं बापा चांगु ।
सत्तेचा नैसर्गु । स्वभाऊँ हा ॥ ८१ ॥

अर्जुनां हाच क्षेत्र व क्षेत्रज्ञ यांचा संबंध होय, हे चांगले
लक्षात आण. सत्तेचा असा निसर्गतः स्वभाव आहे.

आतां अज्ञानासारिखें । वस्तु आपणपेयातें देखे ।
परी रूपें अनेकें । नेणों काणें ॥ ८२ ॥

जैसा रंकु भ्रमला । ह्मणे जा रे मी राॐ आलां ।
कां मूर्च्छितु गेला । सर्वलोका ॥ ८३ ॥

तेवि लचकलिया दीठी । देखणें जें जें उठी ।
तेयां नांव श्रृष्टी । मी वियें गा ॥ ८४ ॥

हेचि आनी भ्रांती । प्रमेय उपलउं पुडुतीं ।
तरि तूं प्रतीती । इयाचि घेइं ॥ ८५ ॥

तरि माझी धरणी । अनादि तरुणी ।
अनिर्वाच्य गुणीं । अविद्या पैं ॥ ८६ ॥

माझेनि चि आंगें । पहुडल्यां हे जागे ।
आणि सत्तासंभोगें । गुर्विणी होये ॥ ८७ ॥

महद्ब्रह्मउदरीं । प्राकृतें आठें विकारीं ।
गर्भाची करी । पेलोवेली ॥ ८८ ॥

इये नाहिं हें चि रूप । ठाणें हें उमप ।
निद्रितां समीप । चेंतां दूरि ॥ ८९ ॥

पैं उभयसंगु पहिलें । बुद्धित्वें उमले ।
बुद्धितत्वें भारैलें । होये मन ॥ ९० ॥

तारुण्यता मनाची । अहंकारत्व रची ।
तेणें महाभूतांची । अभिव्यक्ति होये ॥ ९१ ॥

आणि विषयइंद्रियां गोसी । स्वभावें तरि भूतांसि ।
ह्मणौनि येंति सरिसीं । त्यें हीं रूपा ॥ ९२ ॥

आतां या अज्ञानास अनुसरून आत्मा आत्मस्वरूपाला पाहतो,
पण कोणकोणत्या अनेक रूपाने पाहतो, ते सांगता येत नाही.

ज्याप्रमाणें दरिद्री मनुष्याला भ्रम झाला असतां जा रे मीच राजा आहे !
असें त्यानें म्हणावे; किंवा मूर्च्छिताला वाटलें, कीं तो स्वर्गलोकीं गेला आहे.

त्या प्रमाणें आत्मस्वरूपावरून दृष्टी घसरल्यावर मग जे जे दृश्य समोर
दिसते, त्या सर्वाला सृष्टी हे नांव आहे. आणि ती मीच निर्माण करतों.

आतां हाच सिद्धान्त शंका राहणार नाहीं अशा
रीतीनें सांगतो, पण याचा तू अनुभव घेऊन पहा,

तरी अविद्या ही माझी विवाहित स्त्री आहे, ही अनादि आहे, तरी नेहमी
तरुणीच आहे. व हिच्यामध्यें जे गुण आहेत, ते सांगता येणे शक्य नाहीं.

मी स्वतः निजलो म्हणजे ही जागी राहाते आणि आणि
आत्म सत्तेशीं संयोग पावून ही गर्भ धारण करतें.

मग ही मूळ माया आपल्या उदरांत प्रकृतिजन्य
आठ विकारांनी जगद्रूप गर्भाची वाढ करतें.

हिचें स्वरूप अमुक एक आहे, असें मुळीच नाहीं. हिची आकृती फार
व्यापक आहे; झोंप आली, कीं ही निकट. ज्ञानदृष्टी जागी झाली, कीं दूर.

क्षेत्र व क्षेत्रज्ञ यांच्या संयोगाबरोबर प्रथम बुद्धितत्त्व उत्पन्न होते,
मग या बुद्धितत्त्वानें ओतप्रोत भरलेलें मन जन्माला येतें.

मनाची तरुण स्त्री जी ममता, ती अहंकार नावाचे तत्त्व
निर्माण करते. आणि त्यामुळें महाभूतें आंकारास येतात.

आणि विषय व इंद्रियें यांचा भूतासह संबंध असल्यामुळें
विषय व इंद्रियें ही देखील, त्या भूतांबरोबर आकारास येतात.

जालेनि विकारक्षोभें । पाठिं गुणाचेनि उभे ।
येवं संपूर्ण जे गर्भें । ठायें ठाउँ ॥ ९३ ॥

अशा रीतीने विकार वाढले, म्हणजे पाठोपाठ गुणत्रय उभें राहातें आणि
मग वासनेंत राहिलेला जीव गर्भरूपें हवा त्या स्थळीं प्रविष्ट होतो.

रुखांचा ये वांका । जैसी कां बीजकणिका ।
जीविं बांधे उदका । भेदतखेउँ ॥ ९४ ॥

लहानसे बीज असते त्याचा पाण्याशी संयोग
होताच वृक्षाचा सूक्ष्म आकार तयार करतो;

तैसी माझेनि संगें । अविद्या नाना जगें ।
आरवो लागे । आपणपां चि ॥ ९५ ॥

तशी माझा संग लाभल्याबरोबर ही अविद्या अनेक
जगरूपी अंकुर, सूक्ष्मरूपाने धारण करू लागते.

मग गर्भगोळा तेया । कैसी रूपसे ये आया ।
परियसैं राया । सजनाचेया ॥ ९६ ॥

हे सुजनश्रेष्ठा, मग त्या गर्भगोळ्याला
कोणत्या रूपाचा आकार येतो ते, श्रवण कर.

पैं अंडज स्वदेज । जारज उद्बिज ।
उमटति सहज । अवेव हे ॥ ९७ ॥

तेव्हां अंडज, स्वेदज, उद्भिज्ज व जारज
असे चार अवयव त्याला सहज फुटतात.

व्योमवायुवसें । वांटलेनि गर्भरसें ।
मणिजु उससे । अवेवु तो ॥ ९८ ॥

मणिज हा अवयव आकाश व वायु यांच्या
योगानें गर्भ रसाची वृद्धि झाल्यानें निर्माण होतें.

पोटीं सूनि तमरजें । आगळिका तोय तेजें ।
उठितां निफजे । स्वेदज गा ॥ ९९ ॥

रज आणि तम हे गुण पोटीं घेउन आप आणि तेज
यांचें आधिक्य झालें असतां, स्वेदज निर्माण होतें.

आपपृथ्वीउत्कटें । आणि तमोमात्रें निकृष्टें ।
स्थावरु उमटे । उद्बिजु हा ॥ १०० ॥

आप आणि पृथ्वी यांच्या आधिक्यांने त्यांत निब्बळ तमोगुण
असला, म्हणजे उद्बिज असा स्थावर अवयव उत्पन्न होतो.

पांचां पांच विरजीं । होंति मनबुध्यादि सहजीं ।
आणि इये चि जारजीं । ऐसें जाणैं ॥ १०१ ॥

हीं पांचही महाभूतें आपापसांत सहकार्य करतात, आणि मन व बुद्धी इत्यादी
ज्ञान साधनें तरारली कीं तीं मानव इत्यादी जारज योनींचें कारण होतांत,

ऐसे हे सरळ । करचरणतळ ।
महाप्रकृति स्थूळ । तें चि शिर ॥ १०२ ॥

याप्रमाणे चार योनी ह्या सरळ चार हातपाय समजावे,
आणि मूळची अष्टधा प्रकृति तें ज्याचे मस्तक कल्पावें;

प्रवृत्ती पेललें पोट । निवृत्ति ते पाठि नीट ।
सुरयोनि आंगें आठ । ऊर्धाचीं ॥ १०३ ॥

प्रपंच हें ज्याचें मोठे पोट असून, निवृत्ती ही ज्याची पाठ
आहे, व अष्ट देवयोनी हीं ज्याचीं कमरेच्या वरची अंगें आहेत.

कंठु उल्हासता स्वर्गु । मृत्युलोकु मध्यभागु ।
अधोदेशु चांगु । नितंबु तो ॥ १०४ ॥

स्वर्ग हा ज्याचा विकसित होणारा कंठप्रदेश आहे, मृत्युलोक ही ज्याची कंबर आहे पाताळलोक हा कंबरेखालचा नितंबभाग आहे.

ऐसें लेंकरुं एक । प्रसवली हे देख ।
जेयांचे तीन्ही लोक । बाळसें गा ॥ १०५ ॥

अशा एका लकराला प्रकृतीने जन्म दिला असून तीन्ही लोकांचां पसारा हें त्या लेंकरास चढलेले बाळसें होय.

चौरासी लक्ष योनी । तियें कांडीं पेरी संधानी ।
वाढे प्रतिदिनीं । बाळक हें ॥ १०६ ॥

चौऱ्यांयशीं लक्ष योनी या त्याच्या बोटांची पेरी व सांधे असून, हें बालक दिवसेंदिवस वाढत आहे.

नाना देह अवेवीं । नामाचीं लेणी लेववी ।
मोहो स्तनें वाढवी । नीचनवेनी ॥ १०७ ॥

त्याच्या अंगावर नाना प्रकारच्या नामरूपांचे अलंकार चढवून ही त्या मुलाला मोहरूपी स्तन्य पाजून नित्य नवेपणाने वाढवतें.

सृष्टी वेगळवेगळिया । त्या चि करां आंगुळिया ।
भिन्ना अभिमाना सूदलिया । मुदिया तेथ ॥ १०८ ॥

निरनिराळी सृष्टि ही हातापायांची बोटे असून आणि निरनिराळे अभिमान, ह्या त्यांत मुद्रिका आहेत.

हें एकलौतें चराचर । अविचारातें सुंदर ।
प्रसवौनि थोर । थोरावली ॥ १०९ ॥

याप्रमाणें या एकुलत्या एक सुंदर अशा बालकाला प्रसवून ती प्रकृतिमाया मोठी धन्यता मानूं लागली;

पैं ब्रह्मा प्रातःकाळु । विष्णु तो मध्यान्हवेळु ।
सदाशिव उवीळु । बाळका येया ॥ ११० ॥

या बालकाला ब्रह्मदेव हा प्रातःकाळ विष्णू हा मध्यान्ह काळ व सायंकाळची वेळ हाच सदाशिव होय.

महाप्रळयसेजे । खेळौनि आलें नीजे ।
विषमज्ञानें उमजे । कल्पोदईं ॥ १११ ॥

हे बालक सृष्टीचा खेळ खेळून महाप्रलयरूपी शेजेवर निजतें व पुन्हा कल्पाच्या उदयकाळीं विपरीत ज्ञानानें जागे होते.

अर्जुना इयापरीं । मिथ्यादृष्टीचां घरीं ।
युगवृत्तिचीं करी । चोजवाउलें ॥ ११२ ॥

अर्जुना, याप्रमाणें मिथ्या दृष्टीच्या घरांत हें मूल कोडाकौतुकानें युगामागून युगे येणे हीच एकामागून एक पावले ती कौतुकाने टाकते.

संकल्पु याचा इष्टु । अहंकारु तो निकटु ।
जैं होये तैं सेवटु । ज्ञानें येया ॥ ११३ ॥

या बालकाला संकल्प हा आवडता स्नेही असून अहंकार ही शोभा आहे, असें हें अपार वर्णन केलेलें बाळ देखील आत्मज्ञानानें दिसेनासें होतें.

आतां असो बहू बोली । ऐसें विश्व माया व्याली ।
तैथ चांग जाली । माझी सत्ता ॥ ११४ ॥

अर्जुना ! आता हे बहु बोलणे असो. हे असे विश्व मायेने जन्माला घातले आणि या कामीं माझी सत्ता तिच्या उपयोगास आली.

| | |
|---|---|
| सर्वयोनिषु कौन्तेय मूर्तयः सम्भवन्ति याः । | सर्वयोनिषु, कौन्तेय, मूर्तयः, संभवन्ति, याः, |
| तासां ब्रह्म महद्योनिरहं बीजप्रदः पिता ॥ ४ ॥ | तासाम्, ब्रह्म, महत्, योनिः, अहम्, बीजप्रदः, पिता |

हे अर्जुना ! सर्व योनीमध्ये जेवढे देहाकार आहेत त्या सर्वांचा गर्भ
धारणकरणारी माता प्रकृती आहे आणि बीज पेरणारा पिता मी आहे.

| | |
|---|---|
| येयाकारणें मी पिता । महद्ब्रह्म माता ।<br>अपत्य हा पांडुसुता । जगडंबरु ॥ ११५ ॥ | म्हणूनच मी पिता असून महद्ब्रह्म म्हणजे प्रकती ही<br>माता आहे व अर्जुना, जगताचा विस्तार हे बालक आहे, |
| आतां शरीरें बहुतें । देखौनि न भेदें हो चित्तें ।<br>जें मनबुद्धि भूतें । एकें ययां ॥ ११६ ॥ | आता निरनिराळी पुष्कळशी शरीरे पाहून तू आपले मन भेदभावानें गांगरवूं नकोस,<br>कारण मुळात मन, बुद्धी आदी व पंचमहाभूते ही वेगळी नसून एकच आहेत. |
| हां गा एकी चि देहीं । काइ अनारिसे अवेव नाहिं ।<br>तेवि विचित्र विश्व पाहीं । एक चिं हें ॥ ११७ ॥ | अर्जुना, एकाच देहाचे ठिकाणी निरनिराळे अवयव नसतात काय ?<br>त्याप्रमाणेंच नाना रूपांनीं भासमान होणारें हें विश्व मूलतः एकच आहे. |
| पैं उंचा नीचा डाहाळिया । विषमा वेगळालिया ।<br>एका चि जेवि जालिया । बीजाचिया ॥ ११८ ॥ | ज्याप्रमाणे एकाच बीजाचा वृक्ष होतो, उत्पन्न झालेल्या झाडास लांब,<br>आखूड, अशा भिन्न भिन्न आकाराच्या निरनिराळ्या डहाळ्यावाढतात, |
| आणि संबंधु तो ही ऐसा । मृन्मयो धटु कां जैसा ।<br>कां पटत्व कापुसा । आंतु होये ॥ ११९ ॥ | ज्याप्रमाणे घट हा मातीचा लेक समजला जातो अथवा वस्त्रपण<br>हें कापसाचें नातू. तसा जगत् व मी यांचा संबंध असा आहे. |
| नाना कल्लोळपरंपरा । संतति जैसी सागरा ।<br>आह्मां आणि चराचरां । तैसा पाडु ॥ १२० ॥ | अथवा समुद्रावर उत्पन्न होणाऱ्या असंख्य लाटा ही जशी समुद्राला<br>संतती आहे, त्याप्रमाणें, चरावर व मी यांचा संबंध आहे. |
| ह्मणौनि वन्हि ज्वाळ । दोन्ही वन्ही चि केवळ ।<br>तेवि मी गा हें सकळ । समंधु वाॐ ॥ १२१ ॥ | म्हणून अग्नी व ज्वाला हीं दोन्ही ज्याप्रमाणें, केवळ अग्नीच होत,<br>त्या प्रमाणें मीच सर्व जग आहे हां सर्व संबंध मिथ्या आहे. |
| जालेनि जगें मी झांकें । तरि जगत्वें कोणु फांके ।<br>कीळेवरि माणिकें । लोपिजे काइ ॥ १२२ ॥ | जगाच्या उत्पत्तीमुळें जर माझें स्वरूप लाभतें म्हणावें, तर जग कुणाच्या<br>प्रकाशानें प्रकाशित होतें ? माणकाच्या तेजानें माणिक लोपलें जातें काय ? |
| कां अळंकारत्व आलें । आणि सोनेपण काइ गेलें ।<br>किं कमळत्व फांकले- । पणें जाये ॥ १२३ ॥ | तसेंच सोन्याचे अलंकार बनविल्यानें त्यांतील सोन्याचा सोनेपणा लोपतो<br>काय ? अथवा कमल उमलल्यावर त्याचें कमलत्व नाहींसें होतें कीं काय ? |

सांघ पां धनंया । अवेवी अवेवीया ।
आच्छादिजे किं तेया । तें चि रूप ॥ १२४ ॥

धनंजया, अवयवांनी माणूस झाकला जातो का ?
किंवा अवयवामुळें त्याला शोभा येते ? सांग बरें !

विरूढलेयां जोन्हळा । कणिसांचा निर्वाळा ।
वेचला कीं आगळा । दीसतसे ॥ १२५ ॥

जोंधळ्याचें बी पेरल्यावर त्याला कणीस आलें म्हणजे
जोंधळ्याचा नाश झाला कीं त्याचा आगळाच विस्तार झाला ?

ह्मणौनि जग परौतें । सारूनि पाहिजे मातें ।
तैसा न्हवे उखितें । आघवें चि मीं ॥ १२६ ॥

म्हणून, जगाला बाजूस सारून मला पाहूं म्हणशील,
तर तसा मी नाही, हें संपूर्ण विश्व म्हणजेच मीच आहे.

हा तूं साचोकारा । निश्चयाचा खरा ।
गांठि बांध पां वीरा । जीवाचिये ॥ १२७ ॥

हे वीरा अर्जुना, असा हाच खरोखर तत्त्वविचार
आहे; या सिद्धान्ताचा दृढ निश्चय कर.

आतां मियां मज दाविलां । शरीरीं वेगळालां ।
गुणीं मीं चि बांधलां । ऐसा आवडें ॥ १२८ ॥

निरनिरांळ्या शरीरात एक मीच निरनिराळा भासवितों, तरी
तीं सर्व शरीरे एकाच गुणांनीं बांधलेलीं आहेत असें समज.

जैसें स्वप्नीं आपण । उठौनि आत्ममरण ।
भोगिजे गा जाण । कपिध्वजा ॥ १२९ ॥

हे कपिध्वजा, स्वप्नामध्ये आपण मेल्याची कल्पना करावी
आणि त्या स्वकल्पित मरणाचें दुःख आपण स्वतःच भोगावें;

कां कवळातें डोळे । प्रकाशूनि पीवळें ।
देखति तें हीं कळे । तेयांसी चि ॥ १३० ॥

कावीळ झालेल्या माणसाचे डोळे पिंवळें होतात आणि
मग त्यांनाच इतर वस्तूही पिवळ्या दिसूं लागतात;

नाना सूर्य प्रकाशें । प्रकटी तें अभ्र भासे ।
तो लोपला हें इं दीसे । सूर्यें चि ॥ १३१ ॥

अथवा सूर्याच्या प्रकाशानें जसें अभ्र दिसतें आणि त्या
अभ्रानें सूर्याला झांकले तर तेंही सूर्यप्रकाशानेच दिसते;

पैं आपणपेंनि जालियां । छाया गा आपुलिया ।
भीउनि भियालियां । आवडीजे ॥ १३२ ॥

अथवा आपल्यापासूनच उत्पन्न झालेल्या आपल्या छायेला जर आपण
पाहून भ्यालो तर ती छाया भ्यालेल्या पुरुषाहून कांहीं वेगळी असते का ?

तैसीं इयें नाना देहें । दाउनि मीं नाना होयें ।
एथ ऐसा बंध आहे । तें हीं देखें ॥ १३३ ॥

त्याप्रमाणें मी हीं नानाप्रकारचीं शरीरें दाखवून मी अनेकविध
होतों, त्या ठिकाणी गुणाचा जो बंध होतो, तोही मीच जाणतो,

बद्ध कां न बंधिजे । जाणणें मज माझें ।
हें नेणणेंनि उपजे । आपुलेनि ॥ १३४ ॥

बंध भासतो, पण या बंधांने मी बांधला जात गेलो नाही, हें प्रत्ययास
येतें; आपल्या यथार्थ रूपाच्या अज्ञानानें हा बंध निर्माण होतो.

तरि कोणें गुणें कैसा । मज चि मी बद्ध ऐसा ।
आवडे तें परियसां । अर्जुनदेवा ॥ १३५ ॥

तर अर्जुन देवा, कोणत्या गुणाने बांधला जातो व मला मीच स्यतःला बद्ध झाल्यासारखा भासतों, तें श्रवण कर.

गुण ते किंधर्म । काइ येया नाम ।
कें जालें हें वर्म । अवधारिजो ॥ १३६ ॥

गुण किती आहेत, त्यांचे धर्म कोणते, त्यांची लक्षणें व नांवें कोणतीं, आणि त्यांचा उद्भव कोठें होतो, हें सर्व रहस्य श्रवण कर.

सत्त्वं रजस्तम इति गुणाः प्रकृतिसम्भवाः ।
निबध्नन्ति महाबाहो देहे देहिनमव्ययम् ॥ ५ ॥

सत्त्वम्, रजः, तमः, इति, गुणाः, प्रकृतिसम्भवाः,
निबध्नन्ति, महाबाहो, देहे, देहिनम्, अव्ययम्

हे अर्जुना ! सत्व, रज, तम हे तीन गुण असून ते प्रकृतीपासून निर्माण झाले आहेत. ते या देहांत अविनाशी जीवात्म्याला बांधून ठेवतात.

तरि सत्वरजतम । तिघांसि हें चि नाम ।
आणि प्रकृति जन्म- । भूमि येयां ॥ १३७ ॥

तरी सत्त्व, रज, तम अशीं गुणांची तीन नावें आहेत आणि प्रकृती ही यांची जन्मभूमी आहे.

तेथ सत्व तें उत्तम । रज तें मध्यम ।
तिहिंमाझि तम । सवियां धारें ॥ १३८ ॥

त्या तिघांमध्ये सत्त्वगुण हा उत्तम, रजोगुण मध्यम आहे व तमोगुण हा सहज कनिष्ठ आहे,

हें एकी चि वृत्तीचां ठांइं । त्रिगुणत्व आलें पाहीं ।
वयसात्रय देहीं । एकिं जेवि ॥ १३९ ॥

ज्याप्रमाणे एका देहाचे ठिकाणी बाल्य, तारुण्य व वृद्धत्व ह्या तिन्ही अवस्था असतात, त्या प्रमाणें एकाच वृत्तीच्या ठायीं त्रिगुणत्व भासमान होते.

कां मीनलेंनि कीडें । जंव जंव तूंक वाढे ।
तंव तंव सोनें पडे । पांचिकां कसीं ॥ १४० ॥

किंवा चोख सोन्यांत जों जों हिणकस अधिकाधिक मिळवावें, तसतसा सोन्याचा कस उतरत पंधरा कसाचें अखेर पांचकसी बनतें,

पैं सावधपणें जैसें । वाहविलें आळसें ।
सुषुप्ति बैसे । घणावौनि ॥ १४१ ॥

ज्याप्रमाणे आळस आल्यावर व जागृती नाहींशी झाल्यांवर मग, गाढ झोंप दृढ होऊन बसते;

तैसी अज्ञानांगिकारें । निगाली वृत्ति विस्तारे ।
तें सत्वरजद्वारें । तम हीं होए ॥ १४२ ॥

त्याप्रमाणें, अज्ञानाचां स्वीकार केल्यावर जी कोणतीही वृत्ती विस्तार पावते, सत्त्वरज या द्वारांच्या मार्गानें तम ही होते.

अर्जुना गा जाण । येया नांव गुण ।
आतां दाउं खुण । बांधती ते ॥ १४३ ॥

अर्जुना, याच वृत्तीला गुण असें म्हणतात. आता हे गुण बंधक कसे होतात ते ऐक.

तरि क्षेत्रज्ञदशे । आत्मा मोटका प्रवेशे ।
हें देह मी ऐसें । मुहूर्त्त करी ॥ १४४ ॥

तर जीवात्मा ज्या वेळेस देहाचा अभिमान धारण करतो,
कीं, हे शरीर मी आहें, असे म्हणण्यास तो आरंभ करतो.

आजन्ममरणांतीं । देहधर्मसमस्तीं ।
ममत्वाची सूती । घे ना जंव ॥ १४५ ॥

जन्मा पासून मरेपर्यं हे जे देहाचे धर्म असतात,
त्याविषयी ममत्वाचा अभिमान घेतो न घेतो तोंच,

जैसें मीनाचां तोंडीं । पडे ना जंव उंडी ।
तंव गळु आसुडी । जळवारधी ॥ १४६ ॥

ज्याप्रमाणे गळास लावलेलें आमिष माशानें तोंडांत धरलें
नाहीं, तोंच कोळी जसा गळाला हिसका देऊन ओढतो,

तत्र सत्त्वं निर्मलत्वात्प्रकाशकमनायम् ।
सुखसङ्गेन बध्नाति ज्ञानसङ्गेन चानघ ॥ ६ ॥

तत्र, सत्त्वम्, निर्मलत्वात्, प्रकाशकम्, अनामयम्,
सुख, सङ्गेन, बध्नाति, ज्ञान, सङ्गेन, च, अनघ

हे निष्पापा, त्या तीन गुणांमधील सत्त्वगुण निर्मळ असल्यामुळें प्रकाशद्योतक आणि
विकार रहित आहे. तो सुख आणि ज्ञान यांच्या पाशांनीं जीवास बद्ध करतो.

तेंवि सत्वें लुब्धकें । सुखज्ञानाचीं पाशिकें ।
वोढिजतां खुडके । जैसा मृगु ॥ १४७ ॥

ज्याप्रमाणे मृग पारध्याच्या पाशांत सांपडल्यावर तरफडतो, त्याप्रमाणे
सुख व ज्ञान यांच्या संगानें सत्त्वगुणरूपी पारधी जीवाला बांधतो,

मग ज्ञानें चडफडी । सुख वरि खुरखोडी ।
स्वयंसुख हें धाडी । हातिचें गा ॥ १४८ ॥

आपल्या ज्ञानाचा गर्व वाहून तो अहंकाराच्या दुगाण्या झाडतो, आणि
आपल्यपाशीं असलेलें आपलें आत्मसुख आपणच व्यर्थ घालवितो.

तेव्हंलि विद्यामानें तोखे । लाभमात्रें हरिखे ।
मी संतुष्टु हें इं देखे । श्लाघों लागे ॥ १४९ ॥

मग विद्वान म्हणून कोणीं आपला बहुमान केला असतां हर्षित होतो, आणि
आपण संतुष्टआहोंत हेंही पाहतो व आपल्या सुखस्थितीची प्रशंसा करीत जातो,

ह्मणे भाग्य ना माझें । आजि सुखियें नाहि दुजें ।
विकारें फुंजे । सात्विकाचेनि ॥ १५० ॥

तो म्हणतो, अहो, हें माझें भाग्यच नव्हे का ? माझ्यासारखा सुखी
दुसरा कोणी नाही. असा अष्ट सात्त्विक भावांनी गर्वाला चढतो.

आणि येणें हिं न सरे । लांकण लागे दुसरें ।
जें विद्वत्तेचें भरे । भूत आंगीं ॥ १५१ ॥

आणि एवढ्यानेंच संपत नाहीं तर त्याच्या मागें दुसरे बंधन
लागतें. तें हें कीं, त्याच्या अंगांत विद्वत्तारूपी भुताचा संचार होतो,

आपण चि ज्ञान आहे । तें गेले हें दुःख नोहे ।
किं विषयज्ञानें होये । गगनाएवडा ॥ १५२ ॥

आपण स्वतः ज्ञानरूपी आहोंत याचें ज्ञान नाहींसें झाल्याबद्दल याचे त्याला
काहीच दुःख होत नाही तर उलट, विषयज्ञानानें आकाशाएवढा होतो.

राऊँ जैसा स्वप्नीं । रंकपणें रिंगाला धानी ।
तो गोमटेनि एकें मानी । इंद्र ना मीं ॥ १५३ ॥

ज्याप्रमाणे एखादा राजा स्वप्नांत भिकारी होऊन नगरात शिरतो व त्यास
भिक्षा मागून दोन दाणे मिळाले असतां आपण इंद्र आहो असें समजतों,

तैसें गा देहतीता । जालेयां देहवंता ।
हों लागे पांडुसुता । ब्रह्मज्ञानें ॥ १५४ ॥

अगा पांडुसुता, देहाहून अलग असलेल्या या क्षेत्रज्ञ जीवाला, मी देह आहे, असा देहाचा अभिमान धरल्यावर बाह्य ज्ञानानें त्याची तशी स्थिती होते.

प्रवृत्तिशास्त्रें बुझे । यज्ञविद्या उमजे ।
किंबहुना सुजे । स्वर्गु वेरीं ॥ १५५ ॥

प्रवृत्तिशास्त्रांत तो निपुण होतो, याज्ञिकी त्याला उत्तम अवगत होते, इतकेंच नव्हे, तर ज्ञानगर्वानें त्याला स्वर्गही ठेंगणा होतो.

आणि ह्मणे आजि आन । मीवांचूनि नाहिं सज्ञान ।
चातुर्यचंद्रगगन । माझें चित्त ॥ १५६ ॥

आणि म्हणतो की, माझ्याशिवाय या जगांत दुसरा कोणी ज्ञानवान नाहीं; चंद्र जसा आकाशांत, तसें चातुर्य माझ्याच चित्तांत विलसत असतें.

ऐसें सत्व सुखज्ञानीं । जीवासि लाउनि कान्ही ।
बैलाची करी वानी । पांगुळाचेया ॥ १५७ ॥

याप्रमाणे सत्वगुण हा, जीवात्म्यास सुख व ज्ञान यांच्या काढण्या लावून नंदीबैलासारखा नाचवितो.

आतां हा चि शरीरीं । रजें यिपरीं ।
बांधिजे तें अवधारीं । सांघिजैल ॥ १५८ ॥

आतां हाच शरीरधारी जीवात्मा रजोगुणानें कसा बांधला जातो तो प्रकार सांगतो, ऐक.

रजो रागात्मकं विद्धि तृष्णासङ्गसमुद्भवम् ।
तन्निबध्नाति कौन्तेय कर्मसङ्गेन देहिनम् ॥ ७ ॥

रजः, रागात्मकम्, विद्धि, तृष्णा, सङ्ग, समुद्भवम्,
तत्, निबध्नाति, कौन्तेय, कर्मसङ्गेन, देहिनम्

हे कौंतेया रागरूप रजोगुण इच्छा व आसक्ती यांपासून उत्पन्न झालेला आहे, असे समज. तो आत्म्याला कर्माच्या आसक्तीनें या देहांत बांधून टाकतो.

हें रज यया चि कारणें । जें जीवातें रंजौं जाणे ।
अभिलांखाचे तरुणें । सबाह्य गा ॥ १५९ ॥

या गुणापासून जीवाचे नेहमीं रंजन होतें, हा जिवाला रंजविण्याची कला जाणतो व कामवासना सदैव जागृत राहते.

हें जीवीं मोटकें रिगे । आणि कामाचां मार्गी लागे ।
मग वारेया वळघे । तृष्णेचिया ॥ १६० ॥

या रजोगुणानें अंतःकरणांत थोडासा प्रवेश केल्याबरोबर, जीव कामाच्या मदानें उन्मत्त होतो, मग जीव, वासनारूपी वाऱ्याला मिठी मारतो,

आबुथुनि आगियाळें । वज्राग्नीतें सांदुकिलें ।
आतां बहू थेकुलें । आहे तेथ ॥ १६१ ॥

पेटलेल्या आगीमध्यें तुपाची आहुती पडली, आणखी विद्युत अग्नीने साहाय्य मिळून तो भडकला असता तर ग्रास करायला ती थोडेबहू म्हणत नाहीं.

तैसी खवळली चाड । होये दुःखासकट गोड ।
इंद्रश्री ही सांकड । गमों लागे ॥ १६२ ॥

तशी विषयांची आवड वाढत जाते, व दुःखासकट सर्व गोष्टी गोड वाटतात व इंद्रलोक जरी प्राप्त झाला, तरी त्याची तृप्ती होत नाहीं.

तिया तृष्णा वाढिनलिया । मेरु ही हाता आलेयां ।
ह्मणे वळघों एकादेया । दारुणा हीं ॥ १६३ ॥

अशा प्रकारे विषयवासना वाढल्यावर, मग सोन्याचा मेरुपर्वतही लाभला तर त्यापेक्षाही अधिक मोठी वस्तू प्राप्त व्हावी अशी ओढ जीवाला जडते,

आजि असतें वेचिजैल । तरि पाहे काइ कीजैल ।
ऐसा पांगीं वडील । व्यवसाय गा ॥ १६४ ॥

आपल्याजवळ असलेलें द्रव्य जर आज संपविलें, तर उद्या आपली कांय वाट होणार, असे मनात येऊन विलक्षण आशाळभूतपणानें तो व्यवहाराचा व्याप ताणतो.

जीवीताची कुरवंडी । वोवाळुं लागे कवडी ।
मानी तृणाचिया जोडी । कृतकृत्यता ॥ १६५ ॥

एक कवडी प्राप्त झाली तर तिच्यावरून आपला जीव ओवाळून टाकतो आणि तृणाचें पातेंही लाभलें, तरी तो कृतकृत्यता मानूं लागतो.

ह्मणे स्वर्गा हान जावें । तरि काइ तेथ खावें ।
ययालागि धांवे । याग करूं ॥ १६६ ॥

आणि म्हणतो कीं, जर आपल्यास स्वर्गप्राप्ती झाली, तर तेथे खायला काय मिळणार ? याकरितां यज्ञयागादि क्रिया करतों.

व्रतापाठिं व्रतें । आचरे इष्टापूर्त्तें ।
काम्येवांचूनि हातें । सीवे चि ना ॥ १६७ ॥

मग व्रतांचा सपाटा सुरू करतो; इष्ट व पूर्त कर्मे करतो व काम्य कर्मांवांचून इतरांस तो स्पर्शही करीत नाहीं.

ग्रष्मांतिचा वारा । विसवों नेणे वीरा ।
तैसा न ह्मणे व्यापारां । राति दिउँ ॥ १६८ ॥

ज्याप्रमाणे ग्रीष्मऋतूचे शेवटी सुटणारा वारा क्षणमात्र विसांवा घेत नाहीं. तसा हा रजोगुणी पुरुष व्यापार करीत असतां दिवस अथवा रात्र म्हणत नाहीं.

काइ चंचळु मासा । कामिनीकटाक्षु काइसा ।
वळला होये तैसा । वीजु नाहिं ॥ १६९ ॥

रजोगुणापुढें मासा कसला चंचल आहे ? किंवा कामिनीकटाक्षाचें चंचलपण, तसा तो रजोगुणी पुरुष चंचल असतो. विजेमध्यें तसा चंचलतेचा वेग नसतो;

तेतुलेनि गा वेगें । स्वर्गसंसारु गा पांगे ।
आगीमाजि रिगे । क्रियेचिया ॥ १७० ॥

अशा अति वेगानें स्वर्ग व संसार यांच्या प्रातीकरितां हा क्रियाकर्मांतराच्या आगींत उड्या घेतो.

ऐसा देहीं देहावेगळा । ले तृष्णेचिया सांखळा ।
टोपु वाहे गळां । व्यापाराचा ॥ १७१ ॥

याप्रमाणें देहात असून देहावेगळा जो जीव, तो तृष्णेचे सांखळदंड वागवितो, व नाना प्रकारच्या कर्मांचा व्याप आपल्या गळ्यात लावून घेतो,

हें रजोगुणाचें दारुण । देहिं देहियासि धारण ।
परियसां विंदाण । तमाचें तें ॥ १७२ ॥

देहधारी जो आत्मा त्यास देहामध्यें असतांना, त्याला रजोगुणांचें बळकट बंधन असतें. आतां तमाचें बंधक सामर्थ्य श्रवण कर.

तमस्त्वज्ञानजं विद्धि मोहनं सर्वदेहिनाम् ।
प्रमादालस्यनिद्राभिस्तन्निबध्नाति भारत ॥ ८ ॥

तमः, तु, अज्ञानजनम्, विद्धि, मोहनम्, सर्वदेहिनाम्,
प्रमाद, आलस्य, निद्राभिः, तत्, निबध्नाति, भारत

हे अर्जुना, अज्ञानापासून तमोगुण निर्माण होतो, व तो सर्व प्राण्यांना मोह
पाडतो असें जाण तो या जीवात्म्याला प्रमाद, आळस आणि झोप यांनी बांधतो.

व्यवहाराचे ही डोळे । मंद जेणें पडळें ।
मायारात्रिचें काळें । मेहुडें जें ॥ १७३ ॥

ज्याच्या पडद्यानें मनुष्याची व्यवहाराकडील दृष्टि मंद
होते; व जो मोहरूपी अंधाऱ्या रात्रीचे काळे ढग आहे,

अज्ञानाचें जियालें । जेया येका लागलें ।
जेणें विश्व भुललें । नाचत असे ॥ १७४ ॥

या तमोगुणांला अज्ञानामुळे संजीवन लाभते आणि
याच्या भ्रांतीने सारे विश्व मोहित होऊन नाचत असतें.

अविवेकमहामंत्र । जें मौढ्यमद्याचें पात्र ।
हें असो मोहनास्त्र । जीवासि जें ॥ १७५ ॥

या तमोगुणाचा अविवेक हाच मोठा विवेक ! व तो तमोगुण मूर्खपणारूपी
दारूचे भांडे आहे; हें राहू दे. जो तमोगुण जीवाला मोहनास्त्र आहे.

पार्था तें गा तम । रचूनि ऐसें वर्म ।
चौखुरी देहात्म- । मानीयातें ॥ १७६ ॥

अर्जुना ! असा हा तमोगुण, या लक्षणाने प्रगट होऊन
देह हाच आत्मा असें समजणाऱ्याला जखडून बांधतो.

हें यें विकरि शरीरीं । माजों लागे चराचरीं ।
आणि तेथ दुसरी । गोठी नाहिं ॥ १७७ ॥

हा तमोगुण सर्व स्थावर-जंगम शरीरामध्ये वाढला
असता कीं, मग तेथें तमोगुणाशिवाय दुसरी गोष्टच नसते.

सर्वेंद्रिया जाड्य । मनामाझि मौढ्य ।
माल्हांत दार्ढ्य । आलस्याचें ॥ १७८ ॥

हा सर्व इंद्रियांना जडत्व आणतो, मनात मूर्खपणाच
नांदतो व तो सर्वस्वी आळसाच्या स्वाधीन होतो,

आंगमोडामोडी । कार्यजातां अनावडी ।
नुसंते परिवडी । जांभैयांची ॥ १७९ ॥

मग तो जीव अंगांना आळेपिळें देतो, काम करण्याची
हौस नसतें, वारंवार जांभयांची तर परवडच चालू असते.

उघडिया चि दीठी । देखणें नाहि किरीटी ।
नाळवितां उठी । ओह्मा ह्मणौनि ॥ १८० ॥

अर्जुना, दृष्टी उघडी असली, तो लक्ष घालून काहीही पाहात नाही, आणि
कोणीं हांक मरली नसतांही ओ म्हणून उठण्याचा भ्रमिष्ठपणा करतो.

पडिलिये ढोंडी । कोण कानी मुरडी ।
तिया चि परिवडी । टळों नेणें ॥ १८१ ॥

जमिनीवर पडलेल्या धोंड्यास जसें उजव्या-डाव्या कुशीवर वळणें माहीत
नसतें, त्याप्रमाणें एकदां त्यानें मुरकूंड मारली, की कांही केल्या उठत नाही.

पृथ्वी पाताळा जाॐ । कां आकाश वरि एॐ ।
परि उठावें ऐसा भाॐ । मनी नाहिं ॥ १८२ ॥

पृथ्वी पाताळास जावो अथवा आकाश तुटून पडो, परंतु
आपण इथून उठावे, असे काही त्याच्या मनात येत नाही.

उचितानुचित आघवें । झासुरतां हिं जीवें ।
तेथिचा तेथ लोळावें । ऐसी मेधा ॥ १८३ ॥

आळसामुळें स्वस्थ पडले असतां योग्य काय अथवा अयोग्य काय, हें कांहींही आंठवत नाहीं. त्याचा एकच विचार दृढ असतो आपण आहोत तेथेच लोळावे !

उभूनि करतळें । पडिघाये कपोळें ।
पायांचें सिराळे । मांडूं लागे ॥ १८४ ॥

दोन्ही हाताचे तळवे वर करून गालाला धरतो तो पायांत म्हणजे दोन्ही गुडघ्यांत मान घालून बसून राहतो.

आणि निद्राविषिं चांगु । जीवीं आथि लागु ।
झोंपिं जांतां स्वर्गु । वाॐ ह्मणे ॥ १८५ ॥

आणि झोंपेच्या ठिकाणी अत्यंत आसक्ती असते झोप सांपडली म्हणजे स्वर्गलाभच घडला असें त्यास वाटतें !

ब्रह्मायुषां होइजे । मग निजैलेयां चि असिजे ।
हेंवाचूनि दुजें । व्यसन नाहीं ॥ १८६ ॥

आपल्याला ब्रह्मदेवाचे आयुष्य लाभावें आणि ते आयुष्यभर झोंपूनच असावें, यांशिवाय त्याला दुसरे व्यसन कांहीं नसतें.

वाटे जातां वेगें । कल्हातां हीं डोलों लागे ।
अमृत ही परि नेघे । जरि नीद ए ॥ १८७ ॥

हा वाट चालत असतां सहज कोठें टेंकला तर त्या ठिकाणींही त्याला झोंप लागतें; निद्रा आली असता अमृत प्राप्त आले तरी ते घ्यावेसे वाटत नाही,

तेविं चि आक्रोशबळें । व्यापारें कोण्हीं वेळे ।
तरि निगालें आंधळें । रोसें जैसें ॥ १८८ ॥

आंधळा मनुष्य रागाच्या त्वेषात जायला निघाला असता ज्याप्रमाणे तो कोठेही जातो, तसा हा तमोगुणी चिडून एकदां कामास भिडला, तर काय करील, याचा कांहीं सुमार नाहीं.

केधवां कैसें राहाटावें । कोणेंसिं काइ बोलावें ।
हें टाकतें किं नांगवे । काहिं चि नेणे ॥ १८९ ॥

केव्हा कसें वागावें, कोणाशीं काय बोलावें, अमुक एक कार्य नीट उभे राहील की जमणार नाही, ह्याचाही तो विचार करीत नाहीं.

वणवा मियां आघवा । पाखें चि पूसूनु नेयावा ।
पतंगु इया हांवा । घाली जेवि ॥ १९० ॥

ज्याप्रमाणे एखाद्या पतंगाने आपल्या पंखानें रानांत भडकलेला वणवा पुसून घ्यावा या उत्कट इच्छेनें वणव्यांत उडी घलतो;

तैसा वळघे सहसा । अकारणीं धिंवसा ।
किंबहुना ऐसा । प्रमादु रुचे ॥ १९१ ॥

त्याप्रमाणे साहसी कर्माचे तो धाडस करतो, जें काम करूं नये, ते करण्याची त्यास प्रबळ इच्छा असते. फार काय सांगावे ! असे तो प्रमादच करीत असतो,

एवं निद्राआलस्यप्रमादीं । तम इहिं त्रिविधिं ।
देहिं बांधे निरुपाधी । चोखटातें ॥ १९२ ॥

या प्रमाणें तमोगुण हा निद्रा, आंळस व प्रमाद या तीन पाशांनीं निरुपाधिक व शुद्ध अशा आत्म्याला बांधतो.

जैसा वन्हि काष्टी भरे । तैं दीसे काष्टाकारें ।
व्योम घटें आवरे । तें घटाकाश ॥ १९३ ॥

ज्याप्रमाणें अग्नी काष्ठास लागला असतां तो त्या काष्ठाच्याच आकाराचा दिसतो किंवा आकाश हें घटांत त्या घटाच्या आंकाराप्रमाणें भासतें.

नाना सरोवर भरलें । तेथ चंद्रत्व बिंबलें ।
गुणाभासिं बांधलें । ऐसें गमे ॥ १९४ ॥

किंवा भरलेल्या सरोवरात चंद्राचे प्रतिबिंब पडते, तद्वत्
या गुणांच्याआभासानें आत्मतत्त्व बद्ध झालें असें भासतें.

सत्त्वं सुखे सञ्जयति रजः कर्मणि भारत ।
ज्ञानमावृत्य तु तमः प्रमादे सञ्जयत्युत ॥ ९ ॥

सत्त्वम्, सुखे, सञ्जयति, रजः कर्मणि, भारत,
ज्ञानम्, आवृत्य, तु, तमः, प्रमादे सञ्जयति, उत

हे भारता, सत्त्वगुण सुखाला, रजोगुण कर्माला तसेच तमोगुण
ज्ञानाला झाकून प्रमादाचे ठिकाणीं आसक्ती निर्माण करतो.

रजस्तमश्चाभिभूय सत्त्वं भवति भारत ।
रजः सत्त्वं तमश्चैव समः सत्त्वं रजस्तथा ॥ १० ॥

रजः, तमः, च, अभिभूय, सत्त्वम्, भवति, भारत,
रजः, सत्त्वम्, तमः, च, एव, तमः, सत्त्वम्,रजः, तथा

आणि हे अर्जुना, रजोगुण व तमोगुण यांना दाबून सत्त्वगुण वाढतो. सत्त्वगुण
व तमोगुणांला दाबून रजोगुण वाढतो. तसेच सत्त्वगुण व रजोगुण दडपून तमोगुण वाढतो,

परिहरौनि कफवात । जैं देहीं आटोपे पित्त ।
तैं करी संतप्त । देह जेविं ॥ १९५ ॥

हें पाहा-कफ व वात यांस मागे सारून देहांत
पित्त वाढलें तेव्हां तें पित्त देहाला जसें तप्त करतें;

कां वर्षाांतिं जैसे । जीणौनि शीत चि दीसे ।
तेव्हळि होये हींवा ऐसें । आकाश हें ॥ १९६ ॥

किंवा पाऊस वा उन्हाळा यांस जिंकून गारव्याचा
प्रभाव दिसूं लागतो, तेव्हा सर्व आकाश शीतमयच होते,

नाना स्वप्न जाग्रती । लोपूनि ये सुषुप्ती ।
तैं क्षणु येकु घृती । तें चि होये ॥ १९७ ॥

किंवा स्वप्न व जागृती या दोन्ही अवस्थांचा लोप होऊन
गाढ झोंप लगली तेव्हां क्षणमात्र मन जसें सुषुप्तमय होतें.

तैसीं रजतमें हारवी । जैं सत्व माजु मिरवी ।
तैं जीवाकरवि ह्मणवी । सुखिया ना मीं ॥ १९८ ॥

त्याप्रमाणे रजतमोगुण क्षीण होऊन जेव्हा सत्त्वगुण वाढतो,
आणि जीवाकडून असें म्हणवितो, कीं मी सुखी आहें, कीं नाहीं ?

तैसें चि सत्व रज । लोपूनि तमा भोज ।
वळघे तैं सहज । प्रमादिए होए ॥ १९९ ॥

त्याचप्रमाणें, सत्त्व व रज या गुणांचा लोप होऊन जेव्हा तमाचा
प्रभाव वाढतो, तेव्हां सहजच मनुष्यप्राणी प्रमाद करूं लागतो,

तिया चि गा परिपाटी । सत्वतमातें पोटीं ।
घालूनि जेव्हां उठी । रजोगुणु ॥ २०० ॥

या रीतीने सत्त्व, तम हे दोन गुण
पोटात घालून जेव्हां रजोगुण वर उठतो,

तेव्हळा कर्मे वांचूनि काहीं । आन सौंदर चि नाहीं ।
ऐसें मानी देहीं । देहराजु ॥ २०१ ॥

तेव्हा या देहामध्ये असलेल्या जीवाला कर्मा
वांचून दुसरें कंहीं एक चांगलें दिसत नाहीं.

सर्वद्वारेषु देहेऽस्मिन्प्रकाश उपजायते ।
ज्ञानं यदा तदा विद्याद्विवृद्धं सत्त्वमित्युत ॥ ११ ॥

सर्वद्वारेषु, देहे, अस्मिन्, प्रकाशः, उपजायते,
ज्ञानम्, यदा, तदा, विद्यात्, विवृद्धम्, सत्त्वम्, इति, उत

ज्यावेळी या देहांत तसेच अंतःकरणांत व इंद्रियांत चैतन्य आणि विवेक
शक्ती उत्पन्न होतें, तेव्हां सत्त्वगुणाची वृद्धी झाली आहे असें जाणावें.

लोभः प्रवृत्तीरारम्भः कर्मणामशमः स्पृहा ।
रजस्येतानि जायन्ते विवृद्धे भरतर्षभ ॥ १२ ॥

लोभः, प्रवृत्तिः, आरम्भः, कर्मणाम्, अशमः, स्पृहा,
रजसि, एतानि, जायन्ते, विवृद्धे, भरतर्षभ

हे भरतश्रेष्ठा, रजोगुण वाढल्यावर लोभ, प्रवृत्ती, अफाट कर्मांचा प्रारंभ
दुर्दम्य आशा, आणि विषयभोगांची लालसा ही सर्व उत्पन्न होतात.

अप्रकाशोऽप्रवृत्तिश्च प्रमादो मोह एव च ।
तमस्येतानि जायन्ते विवृद्धे कुरुनन्दन ॥ १३ ॥

अप्रकाशः, अप्रवृत्तिः, च, प्रमादः, मोहः, एव, च,
तमसि, एतानि, जायन्ते, विवृद्धे, कुरुनन्दन

हे कुरुनंदना, तमोगुण वाढल्यावर अविचार, सत्कर्म करण्यास
आळस, अशांती आणि विषयभोगांची लालसा ही सर्व उत्पन्न होतात

यदा सत्त्वे प्रवृद्धे तु प्रलयं याति देहभृत् ।
तदोत्तमविदां लोकानमलान्प्रतिपद्यते ॥ १४ ॥

यदा, सत्त्वे, प्रबुद्धे, तु, प्रलयम्, याति, देहभृत्,
तदा, उत्तमविदाम्, लोकान्, अमलान्, प्रतिपद्यते

सत्त्वाची वृद्धी झाली असतां जर मनुष्य मृत्यू पावला तर तो उत्तम
कर्मे करणाऱ्यांच्या निर्मळ दिव्य स्वर्गादि पुण्यलोकात जातो

रजसि प्रलयं गत्वा कर्मसङ्गिषु जायते ।
तथा प्रलीनस्तमसि मूढयोनिषु जायते ॥ १५ ॥

रजसि, प्रलयम्, गत्वा, कर्मसङ्गिषु, जायते,
तथा, प्रलीनः, तमसि, मूढयोनिषु, जायते

रजोगुण वाढलेला असता जर प्राणी मृत्यू पावला, तर, कर्मांच्या ठायीं आसक्त अशा मनुष्यलोकी
जन्म पावतो; तसेच तमोगुण वाढला असता मरणाऱ्यास पशु, पक्षी, कृमी इत्यादि मूढयोनीत जन्म येतो.

कर्मणः सुकृतस्याहुः सात्त्विकं निर्मलं फलम् ।
रजसस्तु फलं दुःखमज्ञानं तमसः फलम् ॥ १६ ॥

कर्मणः, सुकृतस्य, आहुः, सात्त्विकम्, निर्मलम्, फलम्
रजसः, तु, फलम्, दुखःम्, अज्ञानम्, तमसः, फलम्,

सुकृताचें म्हणजे सात्त्विक कर्माचें सत्त्वप्रधान निर्मल फल मिळतें, राजस
कर्माचे फळ दुःख तसेच तामस कर्माचे फळ अज्ञान सांगितले आहे.

पैं रजतमविजैयें । सत्व गा देहिं इये ।
वाढतां चिन्हिं तियें । ऐसीं होंति ॥ २०२ ॥

अर्जुना ! रज, तम या गुणांना जिंकून जेव्हा या
देहात सत्त्व वाढतो तेव्हां जीं लक्षणें होतात तीं अशीं;

जें प्रज्ञा आंतुलीकडे । न समांत बाहिंरि बोसंडे ।
वसंतिं पद्मखंडें । द्रुति जेवि ॥ २०३ ॥

वसंत ऋतूमध्यें कमल फुलल्यावर त्यांचा वास जसा चहूंकडे पसरतो,
त्याप्रमाणें सत्त्वगुणवती प्रज्ञा आंत न मावतां बाहेर ओसंडूं लागते.

सर्वेंद्रिया आंगणीं । विवेकु करी राबणी ।
साच चि करचरणीं । होंति डोळे ॥ २०४ ॥

सर्व इंद्रियांच्या घरीं विवेकबुद्धी राबत राहते व खरोखर हातापायांनाही
विवेकाने योग्य काय व अयोग्य काय याची दृष्टी प्राप्त होते.

राजहंसापुढें । चांचु वेंची आगरडे ।
तोडी जेवि झगडे । क्षीरानीराचे ॥ २०५ ॥

ज्याप्रमाणे राजहंसापुढे दूध व पाणी यांचे मिश्रण ठेविलें असतां, त्या राजहंसाच्या
चोंचीचें टोंक जसें त्या मिश्रणांतील दूध व पाणी यांची वेगळीक करतें;

तेवि दोषादोषविवेकीं । इंद्रियें चि होति पारखीं ।
नियमु बा रे पाइकी । उँळगे तैं ॥ २०६ ॥

त्या प्रमाणें पापपुण्य निवडण्यांत इंद्रियेंच परीक्षा करणारीं होतात
आणि नियम म्हणजे इंद्रियनिग्रह तर त्याचा सेवेकरीच होतो.

नाइकणें तें कानू चि वाळी । न पाहाणें तें दीठी चि गाळी ।
अवाच्य तें तें टाळी । जीभ चि गा ॥ २०७ ॥

जें ऐकूं नये, तें कानच वर्ज्य करतात; जे पाहण्यास योग्य नसते
तिकडे दृष्टीच वळत नाही जे बालू नये ते बोलणे जीभच टाळते.

वातीपुढां जैसें । पळों लागे काळवखें ।
निषिद्ध इंद्रियां तैसें । समोर नोहे ॥ २०८ ॥

दिव्याच्या ज्योतीपुढून अंधार दूर पळतो त्याप्रमाणें
निषिद्धकर्में त्याच्या इंद्रियांपुढें ठरतच नाहींत.

धाराधरकाळें । महानदी उचंबळे ।
तैसी बुद्धि पघळे । शास्त्रजातीं ॥ २०९ ॥

ज्या प्रमाणे पावसाळ्यात महानदी पुरामुळे उचंबळून येते. त्याप्रमाणे
सत्त्व गुण वाढलां असता त्याच्या बुद्धीचें ठिकाणीं सर्व शात्रांचा पूर येतो.

आगा पूर्णिमेचा दिसिं । चंद्रप्रभा आकाशिं ।
ज्ञानवृत्ति तैसी । फांके सैघ ॥ २१० ॥

पौर्णिमेच्या दिवशीं जशी चंद्राची प्रभा आकाशांत सर्वत्र पसरते,
त्याप्रमाणे सत्त्वगुण वाढलां असता बुद्धीचे ज्ञान सर्वत्र पसरते.

वासना एकावटे । प्रवृत्ति वोहटे ।
मन वावटे । सुखावरि ॥ २११ ॥

वासनावृत्ति एके ठिकाणीं स्थिरावतात, प्रवृत्तिमार्गाकडे त्याचें मन जात नाहीं. आणि विषयांचा भोग घेण्यास मनच विटते.

एवं सत्व वाढे । तैं हें चिन्ह फुडें ।
आणि निधन हीं घडे । तेव्हळां जरि ॥ २१२ ॥

एकंदरींत सत्त्वगुणाची वाढ झाली म्हणजे हीं चिन्हें प्रगटतात. आणि अशा अवस्थेंत जर मरण घडलें,

तरि जैं चि घरिं संपत्ति । तैं चि उदार मनोवृत्ति ।
मां परत्र आणि कीर्त्ति । होये पैं गा ॥ २१३ ॥

त्याचप्रमाणें, घरांत पुष्कळ संपत्ति असून तशीच जर अंतरंगाची वृत्तिही उदार व अंगी धैर्य आहे, मग इहलोकीं कीर्ति आणि परलोकीं सुखलाभ त्यास कां न लाभावा !

कां पाहालेनि सुयाणें । जालेयां परगुणें ।
पढियंते ये पाहुणें । स्वर्गौनियां ॥ २१४ ॥

घरी संपत्ती भरपूर असून मोठा मेजवानीचा योग आहे आणि त्याच वेळी आपले आवडते मनुष्य स्वर्गांतून पाहुणे म्हणून यावें.

मग गोमटेया तेया । जावळि आशे धनंजया ।
तेवि सत्वीं जाणें देहियां । कें आथि गा ॥ २१५ ॥

अर्जुना ! मग त्याच्या त्या उत्तम गतीला उपमा देण्याला दुसरे काही आहे काय ? त्या प्रमाणें सत्त्वगुणानें संपन्न असतां मरणानंतर तो दुसऱ्या कोठे जाईल ?

जें परगुणीं उद्भट । घेउनि सत्व चोखट ।
नीगे सांडूनि कोंपट । भोगक्षाम हें ॥ २१६ ॥

कारण कीं, आपल्या गुणांनीं श्रेष्ठ, असा जो चांगला सत्त्वगुण, घेऊन जो पुरुष भोगांना योग्य असें हें शरीर टाकून निघतो,

अवचटें ऐसा जो जाये । तो सत्वाचा चि नवा होये ।
किंबहुना जन्म लाहे । ज्ञानियांमाझि ॥ २१७ ॥

अशा सत्त्वसंपन्न स्थितींत जो अकस्मात् या देहांतून सुटतो, त्याला पुन्हां सत्त्वगुणानें युक्त असा जन्म मिळतो. फार काय सांगावें ! त्याला ज्ञानी पुरुषांमध्यें जन्म मिळतो.

सांघ पां धनुर्द्धरा । राॐ रायेपणें डोंगरा ।
गेलेयां अपुरा । होये काइ ॥ २१८ ॥

अर्जुना, राजा आपल्या सर्व वैभवासह डोंगरावर गेला, तरी त्याचे राजेपण कोठे कमी होईल का ?

नातारि एथिचा दीवा । नेला सेजेया गांवा ।
तो तेथ तरि पांडवा । दीपू चि किं ॥ २१९ ॥

किंवा अर्जुना ! एका गांवाहून दुसऱ्या गांवास नेलेला दिवा तरी तिथेंही तो प्रकाशमय दीवाच नव्हे काय ?

तैसी तेथ सत्वशुद्धी । आगळें ज्ञानासि उधी ।
तरंगाॐ लागे बुद्धी । विवेकावरि ॥ २२० ॥

त्याप्रमाणें, सत्त्वगुणाची वृद्धी झाल्यावर ज्ञानाची विलक्षण वाढ होते व त्याची बुद्धी विवेकावर पोहूं लागते.

पैं महदादिपरिपाटी । विचारूनु सेवटीं ।
विचारासकट पोटीं । जिरे जेया ॥ २२१ ॥

नंतर महत्तत्त्वादिकांचा विचार करून अखेरीस तो विचार सवें घेऊन ब्रह्मस्वरूपीं लीन होतो.

सत्तिसां सत्ततिसांवें । चोविस पंचविसावें ।
तिहिं पुरौनि स्वभावें । चतुर्थ जें ॥ २२२ ॥

जें छत्तीस तत्त्वांपलीकडीलचें सदतिसावें आहे, किंवा सांख्यमतांतील चोवीस
तत्त्वांपलीकडचें आहे, आणि तीन अवस्था व तिन्ही गुणांहून निराळें असें जे चौथें ब्रह्म,

ऐसें सर्व जें सर्वोत्तम । जालें असे सुगम ।
तेयासवें निरूपम । लाहे देह ॥ २२३ ॥

महाकारण किंवा तुर्यावस्था असे जे सर्वोत्तम ब्रह्म ते त्याला सुलभ
होऊन व त्या सर्वोत्तम सत्त्वाच्या जोरावर त्यास निरुपम देह मिळतो.

मग इया चि परीं देख । तमसत्वा अधोमुख ।
बैसौनि जैं आगळीक । धरि रज ॥ २२४ ॥

हें पाहा, याच प्रमाणें ज्या वेळीं तमोगुण व
सत्त्वगुण यांस दाबून जेव्हां रजोगुणाची वाढ होते.

आपुलेया कार्याचा । धुमाडु गाविं देहाचां ।
माजवी तैं चिन्हाचा । उदो ऐसा ॥ २२५ ॥

व ज्या वेळीं तो शरीररूपगांवांत आपली कृती चोहोकडे
प्रकट करतो, त्या वेळी पुढीलप्रमाणे लक्षणे दिसून येतात.

पांजरली कां वाहुटळीं । करी वेगळ वेटाळी ।
तैसी विषइं सरळी । इंद्रियां होये ॥ २२६ ॥

पसरलेली वावटळ निरनिराळ्या पदार्थांचें एकीकरण करते, त्याप्रमाणें
इष्टनिष्टाचा विचार त्यागून इंद्रिये विषयांच्या ठिकाणी स्वैर वागतात.

परदारादि करावें पडे । परि विरुद्ध ऐसें नावडे ।
मन सेळियेचेनि तोंडें । सैंघ चारी ॥ २२७ ॥

परस्त्रीवर कामुक दृष्टी टाकणें हें तो नीतिविरुद्ध मानीत
नाहीं, व मग शेळीच्या तोंडाप्रमाणें इंद्रियांना स्वैर चरू देतो.

हा ठावोवेऱ्हीं लोभु । करी स्वैरत्वाचा राबु ।
वेटाळितां अलाभु । तें तें उरे ॥ २२८ ॥

त्याचा लाभ अगदीं इथवर स्वैरपणाची राबवणूक करतो. त्याला
दुसऱ्याच्या वस्तू हडप करण्यांत जेथे अपयश येते तेवढ्याच वस्तू उरतात !

आणि आड पडिलेयां । उद्यमजातां भलेतेया ।
प्रवृत्ति धनंजया । हातु न कढी ॥ २२९ ॥

आणि, धनंजया, कोणताही उद्योग समोर ठाको,
त्याची प्रवृत्ती त्या कार्याकडे झाल्यावांचून राहात नाहीं.

तेविं चि एकाधा प्रसादु । कां करावा अश्वमेधु ।
ऐसा अचाटु चि संदु । घेउनि उठी ॥ २३० ॥

त्याच प्रमाणें एखादें मंदिर बांधावें अथवा अश्वमेघ
यज्ञ करावा, असले भलतेच छंद घेऊन तो उद्युक्त होतो.

नगरें चि रचावीं । महावनें चि लावावीं ।
जळाशयें निर्मावीं । नानाविधें ॥ २३१ ॥

नगरांची मांडणी करावी; तळीं, तलाव वगैरे
बांधावे; नाना प्रकारच्या विशाल बागा लावाव्या;

एसैसां अफांटीं कर्मी । समारंभ उपक्रमी ।
आणि दृष्टादृष्टकामीं । पुरें नाहीं ॥ २३२ ॥

अशा प्रकारच्या अवाढव्य कर्मांना तो आरंभ करतो, आणि
ऐहिक वा पारलौकिक कर्मांसंबंधीं तर पुरे म्हणतच नाहीं.

सागरु ही सांडी पडे । आंगिं न लाहे तीनि कवडे ।
ऐसें अभिलाषीं जोडे । दुर्भरत्व ॥ २३३ ॥

स्पृहा मनां पुढपुढां । आशेचा घे दवडा ।
विश्व घापे चाडा । पायांतळीं ॥ २३४ ॥

इत्यादि वाढतां रजीं । इयें चिन्हें होंति सहजीं ।
आणि ऐसेया माझि । वेचे जरि ॥ २३५ ॥

तरि आघवां इहीं । परिवारला देहीं ।
रिगे परि योनी हीं । मानुषे चि ॥ २३६ ॥

सुरवाडेंसिं भिखारी । वसो पां राजपुरीं ।
तऱ्हीं तो काइ अवधारीं । राॐ होईल ॥ २३७ ॥

बैलासि कडबाडें । हें न चुके गा फुडें ।
नेइजो पां वऱ्हाडें । भलेतैसां ॥ २३८ ॥

ह्मणौनि व्यापारा हातीं । उकलु दिहा ना राती ।
तैसेयांचिये । जुंपिजे तो ॥ २३९ ॥

कर्मजडांचां ठांइं । किंबहुना होये देहीं ।
जो रजोवृद्धिचां डोही । बुडौनि निमे ॥ २४० ॥

मग तैसा चि पुडुतिं । रजसत्ववृत्ति ।
गीळूनि जैं ये उन्नती । तमोगुणु ॥ २४१ ॥

तैं जियें लिंगें । देहाचें सबाह्य सांघें ।
तें परियस चांगें । श्रोत्रबळें ॥ २४२ ॥

तरि ऐसें होये मन । जैसें रविचंद्रेंहीन ।
रातिचें गा गगन । अवसेचिये ॥ २४३ ॥

तैसें अंतर असोस । होये स्फूर्त्तिहीन उद्वस ।
विचाराची भास । हारपें तैं ॥ २४४ ॥

महासागराचा अफाट विस्तार ज्यांच्यापुढें कांहींच नाहीं, व अग्नीची दाहक शक्ती व यांचें अमर्यादपणाला तीन कवड्यांइतकी किंमत येणार नाही, अशी त्याची दुर्भर प्रवृत्ती.

त्याची विषयाची हाव एवढी मोठी असते कीं मनात विचार यायच्या आत ती प्रकट होते व इच्छेच्या पायाखालीं सर्व विश्वाच्या पायघड्या घातल्या जातात.

याप्रमाणे रजोगुणाची वृद्धि झाली असता ही लक्षणे व्यक्त होतात आणि त्यांच्या अशा मेळामध्यें असतां जर देहपात झाला,

तर या सर्व लक्षणांनीं युक्त असा तो रजोगुणी पुरुष पुन्हा जन्म घेतो, आणि विशेष म्हणजे त्याला मनुष्ययोनीतच जन्म येतो.

अरे, एखादा भिकारी सर्व प्रकारच्या सुखवैभवांत राजमंदिरांत बसेना का ? म्हणून तो काय राजा होतो ?

बैल जरी श्रीमान् गृहस्थाच्या वऱ्हाडांबरोबर गेला, तरी बैलाच्या नशिबातले कडबा खाणे काही चुकत नाही.

म्हणून व्यापाराच्या चिंतेपुढें रात्रंदिवस ज्यांस उसंत नाहीं, अशा उद्योगी माणसांच्या पंगतीला तो पुढच्या जन्मी जाऊन बसतो.

रजोगुणाच्या, वाढलेल्या स्थितीत ज्यांना मृत्यु येतो ते काम्य कर्मे करणाऱ्या लोकांच्या कुलांत जन्मतात.

त्याप्रमाणें पुढें रज व सत्त्वगुण यांस क्षीण करून तमोगुण उन्नतीला येतो;

तेव्हा त्याची देहामध्ये जी अंतर्बाह्य लक्षणें दिसतात, ती सांगतो. लक्ष देऊन ऐक.

तर मन हें अज्ञानानें इतकें भरून जातें कीं, जणूं चंद्र व सूर्य हे दोन्ही नसलेल्या अमावस्येच्या रात्रीचें आकाशच.

त्या प्रमाणें अंतःकरण पूर्णपणें विचारशून्य निश्चेतन व उदास असतें. व तेथे विचाराची भाषाच राहत नाही,

बुद्धि मेचुचे ना ढोंडी । हा ठाउँ मौवाळै सांडी ।
आठउ देशधडी । जाला दिसे ॥ २४५ ॥

बुद्धी कठीणपणांत दगडालाही मागें सारतें,
स्मरणशक्ती तर विदेशी गेली आहे अशी वाटते.

अविवेकाचेनि माजें । सपाई शरीर गाजे ।
एकलेनि घेपें दीजे । मौढ्यें तेथ ॥ २४६ ॥

त्याचे शरिरावर अंतर्बाह्य अविचार दृष्टीस पडतो, आणि
तेथे नुसत्या केवळ मूर्खपणानेच देण्याघेण्याच्या व्यवहार होतो.

आचारभंगाची हाडें । रूपति इंद्रियां पुढें ।
मरे जरि तेणें कडें । क्रिया जाये ॥ २४७ ॥

सदाचाराचे उल्लंघन हाडाप्रमाणें त्याच्या इंद्रियांना बोचत
असतें आणि तो मेला तरी त्याची क्रिया तमोगुणाकडेच जाते,

पैं आणिक ही एक दिसे । जे दुष्कृतीं चित्त उसासे ।
आंधारीं देखणें जैसें । डुडुळाचें ॥ २४८ ॥

ज्याप्रमाणें घुबडास अंधाऱ्या रात्रींही दिसतें, तसें या तामस
जीवाचें चित्त दुष्ट कर्म करतांना विशेष उल्हसित होतें.

निषिद्धाचेनि नावें । भलतें हीं भरे हांवे ।
तियेविषिं धावे । घेंति करणें ॥ २४९ ॥

त्याचप्रमाणें, निषिद्ध कर्में करण्याची ह्याला फार हांव असते त्या
कर्मांविषयींची इच्छा पूर्ण करण्याकरितां त्याची इंद्रियें धांव घेतात.

मदिरा नेघतां ढुले । सन्निपातेंविण बोले ।
निःप्रेमें चि भूले । पीसें जैसें ॥ २५० ॥

हा तमोगुणी पुरुष दारू न पितां झोकांड्या खातो, सन्निपात न होतांच बरळू
लागतो, आणि प्रेमाशिवायच वेड्याप्रमाणेंतो मोहानें उन्मत्त झालेला असतो.

चित्त तरि गेलें आहे । परि उन्मनी ते नोहे ।
ऐसें माल्हांथिलें मोहें । माजिरेनि ॥ २५१ ॥

त्याचें चित्त तर ताळ्यावर नसतेंच, पण तो उन्मनी अवस्थेंतही
नसतो. याप्रमाणें तो मोहाने उन्मत्त झालेला असतो.

किंबहुना ऐसींऐसीं । चिन्हे गा तमापासीं ।
जैं वाढे आइतिसिं । आपुलिया ॥ २५२ ॥

फार काय सांगावें ! जेव्हां तमोगुण आपल्या सामग्रीनें
वाढतो, तेव्हां हीं सर्व चिन्हें तो ठळकपणें उत्पन्न करतो.

आणि हें चि वायप्रसंगें । मरणाचें जरि खागें ।
तरि तेतुलेन हीं निगे । तमेंसि तो ॥ २५३ ॥

आणि अशा प्रसंगांत जर त्या जीवाला मरण्याचें आमंत्रण आलें,
तर तो तमोगुणी पुरुष तितक्या तमोगुणांसह पुढला जन्म घेतो.

राई रायिपण बीजीं । सांटौनि आंग त्यजी ।
मग विरूढ तैं दुजी । गोठि आहे ॥ २५४ ॥

मोहरीचे झाड आपला मोहरीपणा बियांत सांठवून मग जर आपलें अंग
टाकील व तें बीज जेव्हां रुजतें, तेव्हां मोहरीशिवाय दुसरें कांहीं उगवतें का ?

पैं होउनि दीपकळिका । एरु आगि विझो कां ।
ते लागैल तेथ असिका । तो चि आहे ॥ २५५ ॥

दिव्याच्या रूपाने प्रगट झाल्यावर अग्नी विझला तरी विझेना का ?
पुन्हा पेटल्यावर त्या ठिकाणी तो पूर्वीचाच सगळा अग्नी आहे.

ह्मणौनि तमाचिये लोथे । बांधौया संकल्पातें ।
देह जाये मागुतें । तमाचे होये ॥ २५६ ॥

म्हणुन तमाचा जोर असतांना, तेच संकल्प मनात असताना
जो देह सोडून जातो. तो पुन्हा पुढे तमोगुणी योनीतच जन्म घेतो,

आतां काइ येणें बहुवें । तो तमोवृद्धी मृत्यु लाहे ।
तो पशु कां पक्षी होये । झाड क्रिमि ॥ २५७ ॥

फार काय सांगावें ? तमोगुण वाढलां असतां जो मृत्यू
पावतो, तो पुढील जन्मीं पशु; पक्षी, वृक्ष किंवा कीटक हातो.

कर्मणः सुकृतस्याहुः सात्त्विकं निर्मलं फलम् ।
रजसस्तु फलं दुःखमज्ञानं तमसः फलम् ॥ १६ ॥

कर्मणः, सुकृतस्य, आहुः, सात्त्विकम्, निर्मलम्, फलम्
रजसः, तु, फलम्, दुखःम्, अज्ञानम्, तमसः, फलम,

शास्त्रविहित सात्त्विक अशा पुण्यकर्माचरणाचे फल सात्त्विक आणि निर्मल फल मिळतें,
राजस कर्माचें फल दुःख आहे. तमोगुणी कर्माचे अज्ञान हे फळ होय. असें ज्ञाते सांगतात.

येणें चि कारणें । जें निफजे सत्वगुणें ।
तें सुकृत ऐसें ह्मणे । श्रौतसमो ॥ २५८ ॥

याच कारणास्तव, सत्त्वगुणापासून जें उत्पन्न
होतें, तें पुण्यकर्म, असें श्रुतीचा संकेत सुचवितो.

ह्मणौनि तेया निर्मळ । सुखज्ञानीं सरळ ।
अपूर्व एक फळ । सात्विक तें ॥ २५९ ॥

म्हणून त्या निर्मळ सत्त्वापासून सुख व ज्ञान
हें लोकोत्तर फळ येतें व तेंच सात्त्विक फळ होय.

मग राजसा क्रिया । तिया इंद्रावणी सांसिनलिया ।
जें सुखें चितारूनियां । फळति दुःखें ॥ २६० ॥

रजोगुणाच्या क्रिया म्हणजे फळाला आलेल्या इंद्रवणीच्या फळांप्रमाणें
आहेत; दिसण्यांत सुरेख असून अंतर्यामीं दुःखकारक असतात.

कां निंबोळियेचें पीक । वरि गोड आंतु विष ।
तैसें राजस देख । क्रियाफळ ॥ २६१ ॥

अथवा कडुनिंबाच्या निंबोळ्या बाहेरून सुंदर दिसतात, परंतु आंत विषाप्रमाणे
कडू असतात, त्याप्रमाणें तें राजस क्रियांचें फळ आहे असें समज.

तामस कर्म तेतुकें । अज्ञानफळें चि पीके ।
विषांकुर विषें । जियापरीं ॥ २६२ ॥

ज्याप्रमाणें विषाचा कांदा लावला असतां त्याला विषाचाच अंकुर फुटतो,
त्या प्रमाणें जितकें तामस कर्म आहे, तितकें अज्ञानरूप फळानें पिकतें.

सत्त्वात्सञ्जायते ज्ञानं रजसो लोभ एव च ।
प्रमादमोहौ तमसो भवतोऽज्ञानमेव च ॥ १७ ॥

सत्त्वात्, संजायते, ज्ञानम्, रजसः, लोभः, एव, च,
प्रमाद, मोहौ, तमसः, भक्तः, अज्ञानम्, एव, च

सत्त्वगुणापासून ज्ञान उत्पन्न होतें, व रजोगुणापासून
प्रमाद व मोह आणि अज्ञान हीं उत्पन्न होतात.

ह्मणौनि बा रे अर्जुना । एथ सत्व चि हेतु ज्ञाना ।
जैसा कां दिना । सूर्यु हा ॥ २६३ ॥

म्हणून बा अर्जुना, ज्याप्रमाणे दिवसाला सूर्य हा कारण आहे, त्या प्रमाणें ज्ञानास सत्त्वगुण कारण आहे;

आणि तैसें चि हें जाण । लोभासि रज कारण ।
आपुलें विस्मरण । अद्वैता जेवि ॥ २६४ ॥

ज्याप्रमाणे आपल्या अद्वैतस्वरूपाच्या विस्मृतीस जसें आपलें विस्मरण हें कारण, तसेंच तूं जाणावेंस, कीं लोभाला कारण रजोगुण.

मोहो अज्ञाना प्रमादा । एयां मिळालेयां दोषवृंदां ।
पुडुतीं पुडुतीं प्रबुद्धा । तम चि मूळ ॥ २६५ ॥

मोह, अज्ञान व चुका यांचा मेळावा असाच दोषांचा समुदाय पुढे पुढे जो त्याला वारंवार तमोगुण हेंच कारण आहे.

ऐसें विचाराचां डोळां । तिन्हीं गुण हे वेळोवेळां ।
पाहिजे जैसा आवळा । तळहातिचा ॥ २६६ ॥

तळहातावर ठेवलेला आवळा चहूं अंगांनीं निरखितां यावा, तशीं या तीन गुणांची वेगवेगळीं लक्षणें विचाराच्या डोळ्यांना दिसतील अशी दाखविली.

तंव रजतमें दोन्हीं । देखिलीं प्रौढें पतनीं ।
आणि सत्ववांचूनि नेनीं । ज्ञानाकडे ॥ २६७ ॥

त्यात रज व तम हे दोन गुण मनुष्याच्या पतनास कारण होतात कारण सत्त्वगुणावाचून आत्मज्ञानाकडे प्रवृत्ती होत नाही,

ह्मणौनि सात्विकीं चि वृत्तिं । एक जाले जन्मव्रती ।
सर्वत्यागें चतुर्थी । भागवत जैसे ॥ २६८ ॥

म्हणून ज्याप्रमाणें इतर भक्तींचा त्याग करून ज्ञानी भक्त ज्ञानरूप भक्तीचें जन्मभर आचरण करतात, तसेच कित्येक जन्मभर सात्त्विक वृत्तीचे व्रत आचरतात.

ऊर्ध्वं गच्छन्ति सत्त्वस्था मध्ये तिष्ठन्ति राजसाः ।
जघन्यगुणवृत्तिस्था अधो गच्छन्ति तामसाः ॥ १८ ॥

ऊर्धम्, गच्छन्ति, सत्त्वस्थाः, मध्ये, तिष्ठन्ति, राजसाः,
जघन्य, गुण, वृत्तिस्था, अधः, गच्छन्ति, तामसाः

सत्त्वगुणी पुरुष वर स्वर्गलोकात जातात, जे रजोगुणी आहेत, ते मनुष्य योनीला पावतात, निंद्यगुणी पुरुष खालच्या पश्वादि अधम योनीत जातात.

तैसे सत्वाचेनि नडनाचें । असणें जाणें तेयांचें ।
ते तनूत्यागीं स्वर्गीचे । राये होंति ॥ २६९ ॥

अशा प्रकारें जे सात्त्विक वृत्तीचें नेहमीं आचरण करतात, शेवटी त्यातच ज्याचा मृत्यू झाला ते देहत्यागानंतर स्वर्गाचे राजे होतात.

इया चि परी पैं रजें । जिहिं कां जिजे मरिजे ।
तिहिं मनुष्यां होइजे । मृत्युलोकिं ॥ २७० ॥

याचप्रमाणे जे रजोगुणी कर्माचे जन्मभर आचरण करतात व त्यातच देहत्याग करितात, ते मृत्युलोकीं मनुष्ययोनींत जन्म घेतात.

तेथ सुखदुःखाचें खिचटें । जेविजे येकें चि ताटें ।
जेथ इये मरणवाटे । पडिलें नूठी ॥ २७१ ॥

त्यालोकीं त्यांना सुखदुःखाची खिचडी एकाच ताटांतून खावी लागते तसेंच या जन्म मृत्यूच्या वाटेंत सांपडले असल्यामुळें बाहेर पडता येत नाहीं.

आणि तिया चि स्थिती तमीं । जे वाढौनि मोडौनि क्षमीं ।
ते घेंति नरकभूमी । मूळपत्र ॥ २७२ ॥

आणि जे तमांत वाढले व तमांतच या भोगक्षम देहाचा पात
होऊन बाहेर पडले, ते नरकभूमीला जाण्याचा दाखला घेतात.

एवं वस्तुचिया सत्ता । त्रिगुणासि पांडुसुता ।
दाविली साकार्यता । आघवी चि हे ॥ २७३ ॥

अर्जुना, याप्रमाणें ब्रह्मवस्तूच्या सत्तेनें वाढणाऱ्या या तिन्ही
गुणंनाच सर्व सृष्टीचे कारणत्व आहे, हे तुला दाखविले.

पैं वस्तु वस्तुत्वें असिकें । तें आपण चि गुणांसारिखें ।
देखौनि कार्यविशेषें । अनुकरे गा ॥ २७४ ॥

वास्तविक पाहातां, ब्रह्मवस्तूच्या स्वरूपांत कांहींच भेद होत नाही तरी ती वस्तू
आपण होऊन त्या त्या प्रसंगी त्या त्या गुणांच्या लक्षणांस अनुसरून क्रिया करतें.

जैसें कां स्वप्नीं परिव्राजें । जैं राउँ मीं हें देखिजे ।
तैं हारि जैत होइजे । आपण चि ॥ २७५ ॥

आपण राजे झालों आहोत, व आपल्यावर परचक्र आलें
आहे, व त्यात आपला जय व पराजय आपणच होतो,

तैसें मध्य ऊर्ध अध । हे जे गुणत्रिभेद ।
ते वृत्तिवांचूनि शुद्ध । वस्तु चि असे ॥ २७६ ॥

त्या प्रमाणें उत्तम गती, मध्यम गती व अधोगती, हे सर्व गुणांचेच प्रकार
आहेत, ती गुणांची दृष्टी जर टाकली, तर ब्रह्म वस्तू शुद्ध आहे तशीच आहे.

परि हे वाहणी असो । तऱ्हीं तुज आन न दीसो ।
परियसैं ते सांघतसों । मागिलि गोठी ॥ २७७ ॥

परंतु आता अशा निरूपणाचा प्रवाह पुरे. हें आमचें सांगणे विषयांतर
झालें, असे तूं मानूं नकोस. आतां मागील विषय पुढें सांगतों, ऐक.

नान्यं गुणेभ्यः कर्तारं यदा द्रष्टानुपश्यति ।
गुणेभ्यश्च परं वेत्ति मद्भावं सोऽधिगच्छति ॥ १९ ॥

न, अन्यम्, गुणेभ्यः, कर्तारम्, यदा, द्रष्टा, अनुपश्यति,
गुणेभ्यः, च, परम्, वेत्ति, मद्भावम्, सः, अधिगच्छति

ज्यावेळी द्रष्टा तिन्ही गुणांशिवाय दुसरा कोणीही कर्ता नाही, असें जाणतो व गुणाच्या
पलीकडे असलेल्या आपल्या स्वरूपाला जाणतो तेव्हां तो माझ्या स्वरूपाला पावतो.

तरि ऐसें निजनिजें । सामर्थे तीन्हीं सहजें ।
होतिं देहव्याजें । गुण चि हे गा ॥ २७८ ॥

तर हे तिन्ही गुणच, आपल्या सामर्थ्यानें,
देहाच्या आधारावर उत्पन्न होतात.

इंधनाचेनि आकारें । अग्नि जैसा अवतारे ।
कां आवगे तरुवरें । भूमिरसु ॥ २७९ ॥

लांकडाच्या आकारानें अग्नी जसा आकाराला येतो, किंवा
भूमि व पाणी यांचा आकार जसा झाडांत दृष्टीस पडतो;

नाना दहियांचेनि मीसें । परिणामें दूध जैसें ।
कां मूर्त्तहोये ऊंसें । गोडी जेवि ॥ २८० ॥

अथवा जसे दूधच दह्याच्या रूपाने परिणाम पावते
अथवा गोडी जशी उसाच्या निमित्तानें मूर्तिमंत होते,

तैसें हें सांतष्करण । देह चि होंति गुण ।
ह्मणौनि बंधा कारण । घडे किर ॥ २८१ ॥

तसे हे तीन गुणच अंतःकरणासह देहरूपें धारण
करतात; आणि म्हणून तर तें बंधाला कारण होतात.

परि चोज हें धनुर्द्धरा । जें येवडां इये गुंपिरां ।
मोक्षाचा संवसारा । गुणा न्हवे ॥ २८२ ॥

परंतु अर्जुना, आश्चर्य हें आहे कीं, यांचा एवढा मोठा गुंता
असूनही जीवाच्या मुक्त स्थितीला कमीपणा येत नाहीं.

गुण आपुलालेनि धर्में । देहिचें माधुतसाउभें ।
चाळितां न खोमे । गुणातीतता २८३ ॥

तिन्ही गुण आपापल्या धर्माप्रमाणें देहाच्या मागुते सामोरे वावरत असूनही
निर्गुण आत्मतत्त्वाला कोणत्याही प्रकारें कमीपणा आणीत नाहींत.

ऐसी मुक्ति असे सहज । आतां परियसौं तुज ।
तें तूं ज्ञाना बुझ । द्विरेफु किं ॥ २८४ ॥

अशी स्वभावतः मुक्त स्थिती आहे, ती सहज लाभण्यासारखी असतें, हें आम्ही
आतां तुला सांगणार आहोंत. कारण तू ज्ञानकमलावरचा जणूं भ्रमरच आहेस.

आणि गुणीं गुणां जोगें । चैतन्य नोहे हें मागें ।
बोलिलें तें खागें । तेविं चि हे ॥ २८५ ॥

आणि गुणांमध्यें असूनही चैतन्य तत्त्व गुणांसारखें होत नाहीं,
हीं वस्तुस्थिती सांगितली, तसेंच या स्थळींही समजावेस.

तरि पार्थातें ऐसें । बोधलेनि जीवें दीसे ।
स्वप्न कां जैसें । चेइलेनि ॥ २८६ ॥

तेव्हां, अर्जुना, ज्यावेळीं जीवाला आत्मबोध होतो, तेव्हां गुणांपासून चैतन्य
वेगळें आहे असें दिसतें. ज्या प्रमाणें जागें झालें असतां स्वप्न नाहींसें होतें;

नातरि आपणपें जळीं । बिंबलें तीरींहुनि कळी ।
चलन होंत कल्लोळीं । अनेकधा ॥ २८७ ॥

तीरावर उभा राहून एखादा मानुष्य पाण्यात आपले प्रतिबिंब पाहतो व लाटंनी ते
हलते आहे हे पाहतो, पण माझा त्याच्याशी काही एक संबंध नाही, असेही जाणतो.

कां नटलेनि लाघवें । नटु जैसा न झंकवे ।
तैसे गुणजात देखवे । न्हवौनियां ॥ २८८ ॥

आपण घेतलेल्या सोंगानें जसा नट फसला जात नाहीं, त्याप्रमाणें
गुणांस वश न होतां साक्षी होऊन त्यांचे अवलोकन करावें.

रितुत्रय आकाशें । धरुनियां जैसें ।
नेंदिजे चि येॐ वोसें । वेगळेपणें ॥ २८९ ॥

आकाश तिन्ही निरनिराळ्या ऋतूंचा अंगिकार करतें, पण
त्यांच्याहून आपला असलेला वेगळेपणा नाहीसा होऊ देत नाही.

तैसें गुणिं गुणां परौतें । जें आपणपें असे आइतें ।
तिये अहं बैसे अहंते । मूळिके चि जैं ॥ २९० ॥

त्याप्रमाणें जेव्हां गुणांमध्यें असूनही जें आपलें गुणांपलिकडील अस्तित्व
स्वतःसिद्ध आहे, अशा त्या मूळ ब्रह्मरूपी अहंतेवर अहंकार विराजित होतो.

तैं तेथौनि मग पांतां । ह्मणे साक्षी मी अकर्त्ता ।
हे गणु चि क्रियाजाता । नियोगी ना ॥ २९१ ॥

तेव्हां त्या भूमिकेवरून पाहात असतां म्हणतो, कीं मी तर
अकर्ता आहे, साक्षी आहे. आणि सर्व क्रिया गुणांपासून होतात.

सत्वरजतमाचां । भेदीं पसरु कर्माचा ।
होंतसे तो गुणाचा । विकारु हा ॥ २९२ ॥

सत्त्व, रज तम या गुणांपासून निरनिराळीं कर्मे
जीं होतात, तें कर्मकांड म्हणजे गुणांचाच विकार आहे

एयामाझि मीं ऐसा । वनीं कां वसंतु जैसा ।
वनलक्ष्मीविलासा । हेतुभूत ॥ २९३ ॥

वनशोभेला जसा वसंत ऋतु कारण असतो, परंतु
तो अलिप्त असतो, तसा मी गुणांच्या विकारांमध्यें आहें.

कां तारागणीं लोपावें । सूर्यकांतें उद्दीपावें ।
कमळीं विकाशावें । जावें तमें ॥ २९४ ॥

अथवा ताऱ्यांच्या समुदायांनीं लोपावें, सूर्यकान्त मण्याने प्रज्वलित
व्हावें, कमळाच्या फुलाने प्रफुल्लित व्हावे व अंधकार नाहीसा व्हावा.

इयें कोण्हाचीं काजें कहीं । सविता जैसीं नाहीं ।
तैसा अकर्त्ता मीं देहीं । सत्तारूपु ॥ २९५ ॥

यापैकी कोणाचीही कार्ये ज्याप्रमाणे सूर्य काहीही हेंतुतः कर्तेपणा घेत नाही
तसा त्याप्रमाणे या सर्व देहांमध्ये मी अकर्ता असा केवळ सत्तारूप आहे.

मीं दाउनि गुण देखें । गुणता हे मियां पोखे ।
एयाचेनि निःशेषें । उरे तें मीं ॥ २९६ ॥

मीं दाखविल्यानें गुण दृष्टीस पडतात, माझ्याच सत्तेनें गुण
वाढतात, व या गुणांचा निरास झाल्यावर जें उरतें, ते मीं आहें.

ऐसेनि विवेकें जेया । उदौ होये धनंजया ।
ये गुणातीतत्व तेया । ऊर्ध्वपंथें ॥ २९७ ॥

अर्जुना, अशा विवेकबुद्धीनें जो उंचांवला आहे, त्याला
सहजच त्याची मूळची गुणातीत ब्रह्मस्थिति प्राप्त होते.

गुणानेतानतीत्य त्रीन्देही देहसमुद्भवान् ।
जन्ममृत्युजरादुःखैर्विमुक्तोऽमृतमश्नुते ॥ २० ॥

गुणान्, एतान्, अतीत्य, त्रीन्, देही, देह, समुद्भवान्,
जन्म, मृत्यु, जरा, दुःखैः, विमुक्तः, अमृतम्, अश्नुते

हा देहाभिनानी जीव शरीराच्या उत्पत्तीला कारण असलेल्या या तिन्ही गुणांना उल्लंघून
जन्म, मृत्यु व वार्धक्य आणि सर्व प्रकारच्या दुःखापासून मुक्त होऊन अमृतत्त्व मोक्ष पावतो.

आतां निर्गुण असे आणिक । तें तो जाणे हें अचूक ।
जें ज्ञान केलें ठीक । तेया चि वरि ॥ २९८ ॥

आतां निर्गुण म्हणुन जे आणखी आहे, तें तो बिनचूक जाणतो.
कारण ज्ञानानें त्याच्यावर आपला ठसा नीट उठविला असतो.

किंबहुना पांडुसुता । ऐसा तो माझिया सत्ता ।
पावे जैसी सरिता । सिंधुत्व गा ॥ २९९ ॥

एवढेच नाही तर, अर्जुना ! ज्याप्रेमाणे नदी सागरास मिळाली म्हणजे
स्वतः सागररूप होते त्याप्रमाणे तो माझ्या अविनाशी सत्तेशी ऐक्य पावतो.

नळिकेवरौनु उठिला । जैसा शुकु शाखे बैसला ।
तैसा मूळअहंते ठेला । तो ह्मणौनि ॥ ३०० ॥

ज्याप्रमाणे पिंजऱ्यातील नळीवरून उडालेला पोपट झाडाच्या फांदीवर बसावा
तसा तो देहअहंता सोडून, अहं ब्रह्मास्मि, या मूल अहंतत्त्वावर ठाण मांडतो.

आगा अज्ञानाचिया नीदा । घोरतु होंता तत्वधा ।
तो सस्वरूपिं प्रबोधा । चेइला किं ॥ ३०१ ॥

हे ज्ञानवंता, जो अज्ञांनरूप निद्रेंत खूप जोरजोरानें घोरत होता,
ती निद्रा टाकून देऊन तो आपल्या ब्रह्मस्वरूपाच्या ठिकाणी जागा होतो.

पैं बुद्धिभेदाचा आरिसा । तेया हातूनि पडिला वीरेशा ।
ह्मणौनि प्रतिमुखाभासा । मूकला तो ॥ ३०२ ॥

वीरश्रेष्ठा अर्जुना, बुद्धिभेद करणारा मोहाचा आरसा हातात धरला होता
तो, त्याच्या हातूंन पडला म्हणून तो आतां प्रतिबिंबाला मुकला आहे.

देहभिमानाचा वारा । आतां वाजों ठेला वीरा ।
तैं ऐक्य वीचिसागरा । जीवेशा होये ॥ ३०३ ॥

हे वीरा, आतां ह्या पुरुषाच्या ठिकाणीं देहाभिमाचा वारा थांबला म्हणून लाटांचें जसें
समुद्राशीं ऐक्य होतें, त्याप्रमाणे देहाभिमानाचा वारा बंद झाल्यामुळे जिवाशिवाचे ऐक्य आहे

ह्मणौनि मद्भावेंसि । पाविजे तेणें सारिसिं ।
वरिषांतिं आकाशीं । घने जेवि ॥ ३०४ ॥

ज्याप्रमाणें वर्षाऋतु संपला, कीं समस्त मेघराशी आकाशरूप होऊन जातात, त्याप्रमाणेच
अज्ञानभ्रांती पूर्ण नाहीशी झाल्याबरोबर जीवात्मा ब्रह्मतत्त्वांत लय पावून तद्रूप हातो.

तेवि मी होउनि निरुता । मग देहीं चि इये असतां ।
नांगवे देहसंभूतां । गुणासि तो ॥ ३०५ ॥

आणखी, अशा प्रकारें ब्रह्मभावास पोंचल्यावर मग जरी तो या देहांत
असला, तरी देहाच्या आश्रयाने असणाऱ्या गुणांनी तो बद्ध होत नाही.

जैसा भिंगाचेनि घरें । दीपप्रकाशु नावरे ।
कां न विझे चि सागरें । वडवानळु ॥ ३०६ ॥

जसा कांचेच्या किंवा अभ्रकाच्या आच्छादनानें दिव्याचा प्रकाश
कोंडला जात नाही अथवा समुद्राच्या पाण्यानें वडवाग्नी विझत नाहीं,

तैसा आलां गेलां गुणांचा । बोधु न मैळे तेयाचा ।
तो देहीं जैसा व्योमिचा । चंद्र जळीं ॥ ३०७ ॥

त्या प्रमाणें गुणांच्या येण्याजाण्यानें त्याचा बोध मळत नाहीं. आकाशींचा चंद्र जसा
पाण्यांतप्रतिबिंबित झाला, तरी निर्लेपच राहतो, तसा तो शरीरीं वावरत असतो.

तीन्ही आपुलिया प्रौढी । देह नाचविति बागडी ।
तो पाहों न धडी । अहंतेतें ॥ ३०८ ॥

तिन्ही गुण आपापल्या सामर्थ्यानें देहामध्यें चेष्टा करतात,
परंतु ज्ञानी पुरुष त्यांची यत्किंचितही अहंता धरत नाही,

हा ठाऊँवेर्‍हीं । निहटौनि गेला अंतरीं ।
आतां काइ वर्त्ते शरीरीं । कांहीं नेणे ॥ ३०९ ॥

येथपर्यंत तो अंतःकरणांत दृढ निश्चयानें राहिला आहे. म्हणून
देहाच्या ठिकाणीं काय घडत आहे, हें तो कांहीं जाणत नाहीं.

सांडूनि आंगिचि खोळी । सर्पु रिगालेयां पाताळीं ।
ते त्वचा कोण सांभाळी । तैसें जालें ॥ ३१० ॥

साप आपली कात टाकून बिळात प्रवेश केल्यावर, त्याने टाकलेली
कात कोण सांभाळीत बसतो ? तसाच प्रकार येथें घडतो.

कां सोरभ्यजीर्णु जैसा । अमोदु मीळौनियां आकाशा ।
माघारा कमळकोशा । ए चि ना ॥ ३११ ॥

अथवा कमळांतील सुवास परिपक्व झाल्यावर, तो सुवास
आकाशांत उडून जातो, व पुन्हा कमळाचे ठिकाणी येत नाही,

पैं सस्वरूपसमरसें । तेया ही गा जालें तैसें ।
तेथ किंधर्म हें ऐसें । नेणे देह ॥ ३१२ ॥

अर्जुना, ब्रह्माशीं ऐक्य पावल्यामुळें त्याचेंही तसेच झालेलें असतें, देहाचे काय धर्म आहेत व देह कसा आहे, हें तो जाणत नाहीं.

ह्मणौनि जन्मजरामरण । इत्यादि साई गुण ।
ते देहीं चि ठेले कारण । नाहीं तेया ॥ ३१३ ॥

म्हणून जन्म-जरा-मरण इत्यादि जे सहा विकार, ते त्याच्या देहाच्या ठिकाणी राहतात. ज्ञानीपुरुषाचा त्यांच्याशी काही एक संबंध नसतो.

घटाचिया खापरिया । घटाचां भागीं फोडिलेयां ।
मा आकाश आपैसेया । जालें चि असे ॥ ३१४ ॥

घट फूटून त्याच्या ठिकऱ्या झाल्या म्हणजे घटाकाश आपोआपच महदाकाश झालेंच म्हणून समजावें. त्याला महदाकाशात मिळावे लागत नाही,

तैसी देहबुद्धि जाये । जैं आपणपें आठौ होये ।
तैं आन काहिं आहे । तेंवांचूनि ॥ ३१५ ॥

त्याप्रमाणें देहाभिमानाचा लोप झाला म्हणजे आपल्या मूळच्या शुद्ध स्वरूपाचे जीवाला ज्ञान होते, अन्य काहीच त्याच्या जाणिवेत नसते.

येणें थोरें बोधलेपणें । तेया गा देहीं असणें ।
ह्मणौनि तो मी ह्मणें । गुणातीतु ॥ ३१६ ॥

अशा थोर ज्ञानसंपन्नतेनें युक्त होऊन तो शरीरांत राहतो, म्हणून मी त्याला गुणातीत म्हणतो,

येया देवाचेया बोला । पार्थु अति सुखावला ।
मेघें संबोखिला । मयूर जैसा ॥ ३१७ ॥

मेघाची गर्जना ऐकून जसा मोराला संतोष होतो, त्या प्रमाणें भगवंताचे बोल ऐकून अर्जुन अत्यंत आनंदित झाला.

अुर्जन उवाच -
कैर्लिङ्गैस्त्रीन्गुणानेतानतीतो भवति प्रभो ।
किमाचारः कथं चैतांस्त्रीन्गुणानतिवर्तते ॥ २१ ॥

कैः, लिंगैः, त्रीन्, गुणान्, एतान्, अतीतः, भवति, प्रभो,
किमाचारः, कथम्, च, एतान्, त्रीन्, गुणान्, अतिवर्तते

अर्जुन म्हणाला, हे प्रभो ! पुरुष या तीन गुणाच्या पलीकडे गेला हे कोणत्या चिन्हांनी ओळखावा ? त्याचे आचरण कसें असतें ? आणि तो तीन गुणांना कसा ओलांडून जातो ?

तेणें तोषें वीरु पूसे । जी कोणी चिन्हिं तो दिसे ।
जेयामाझि वसे । ऐसा बोधु ॥ ३१८ ॥

असे भगवंताचे बोलणे ऐकून संतुष्ट झालेला अर्जुन विचारू लागला कीं, महाराज, ज्या पुरुषामध्यें असा आत्मबोध झाला आहे, त्याचीं लक्षणें काय असतात ?

तो निर्गुण काइ आचरे । कैसेनि गुण निस्तरे ।
सांघिजो हें माह्येरें । कृपेचेनि ॥ ३१९ ॥

तो गुणातीत पुरुष काय आचरण करतो ? व गुणांचें निवारण कसें करतो ? हे कृपाळू मायबाप श्रीकृष्णा ! तेव्हां हें सर्व मला स्पष्ट करून सांगा.

येया अर्जुनाचेया प्रश्ना । तो षड्गुणाचा राणा ।
परिहारु आकर्णा । बोलतु असे ॥ ३२० ॥

या अर्जुनाच्या प्रश्नास षड्गुणेश्वर्यसंपन्न उत्तर देऊन त्याच्या शंकेचा परिहार करण्याकरिता काय उत्तर देतात तें ऐका.

श्रीभगवानुवाच -
प्रकाशं च प्रवृत्तिं च मोहमेव च पाण्डव ।
न द्वेष्टि सम्प्रवृत्तानि न निवृत्तानि काङ्क्षति ॥ २२ ॥

प्रकाशम्, च, प्रवृत्तिम्, च, मोहम्, एव, च, पाण्डव,
न, द्वेष्टि, सम्प्रवृत्तानि, न, निवृत्तानि, कांक्षति

श्रीकृष्ण म्हणाले, हे पांडवा, प्रकाश, प्रवृत्ती आणि मोह हीं तिन्ही गुणांचीं कार्यें प्राप्त झालीं
असतां त्यांचा विषाद मानत नाहीं आणि प्राप्त झांली नाही तरी त्यांची आकांक्षाही करीत नाहीं.

ह्मणे हे पार्था तूझी नवाई । येतुलें चि पूससी काई ।
तें नांव चि तेया पाईं । साच ल्टकें ॥ ३२१ ॥

अर्जुना ! तुझे आश्चर्य वाटते. हाच का तुझा प्रश्न आहे ? गुणातीत
हें नांव उच्चारण्या बरोबरच त्याचें आचरण काय हा प्रश्न संभवत नाहीं.

गुणातीतु जेया नांव । तो गुणाधीनु तरि न्हवे ।
मा होये तरि नांगवे । गुण येयां ॥ ३२२ ॥

ज्याला गुणातीत म्हणतात, तो गुणाधीन खास नसतो; तो जरी कदाचित
गुणांत वावरत असला तरी तो गुणांच्या हातांत सांपडत नाहीं.

परि आधीनु कां नांगवे । हें कैसेनि जाणावें ।
गुणाचिये उखरेवे- । माझि असतां ॥ ३२३ ॥

गुणाच्या गलबल्यात वावरत दिसतानाही तो
गुणांच्या अधीन आहे किंवा नाहीं हें कसें जाणावें ?

हा संदेहो जरि वाहांसि । तरि सुखें पूसों लाहासि ।
परियस आतां तेयासि । रूप करूं ॥ ३२४ ॥

हीच जर तुझ्या मनात शंका असेल, तर तुझा तो प्रश्न
सुखानें विचार. आता गुणातीततेचे स्वरूप सांगतो, ऐक.

तरि रजाचेनि माजें । देहिं कर्माचें आणोजें ।
प्रवृत्ती जैं घेइजे । वेंटाळूनि ॥ ३२५ ॥

रजोगुणाच्या वृद्धीने तो गुणातीत पुरुष ज्या वेळेला प्रवृत्तीनें
वेढला जातो त्यावेळीं त्याच्यामध्यें कर्माचे अंकुर फुटतात.

तैं मीं चि ना कर्मठु । ऐसा नैये श्रीमाठु ।
कां दरिद्रबुद्धी वीटु । तो ही नाहिं ॥ ३२६ ॥

मी कर्म करणारा असा त्याला अहंकार उत्पन्न होत नाही
किंवा कर्म निष्फळ झालें असतांही ज्याला वाईट वाटत नाहीं;

अथवा सत्वें चि अधिंके । जैं सर्वेंद्रीं ज्ञान फांके ।
तैं सुविद्यता न तोखे । उभजे ही ना ॥ ३२७ ॥

अथवा सत्त्वगुणाची वाढ होऊन जेव्हां सर्व इंद्रियांवर ज्ञानतेज पसरतें, तेव्हां
मी सुविद्य आहे, असा त्याला संतोष वाटत नाही किंवा तो खिन्नही होत नाहीं.

कां वाढिनलेनि तमें । गीळिजे मोहभ्रमें ।
तैं अज्ञानत्वें श्रमे । घेणें हिं नाहिं ॥ ३२८ ॥

किंवा तमोगुण वाढला असता तो गुणातीत पुरुष, मोह, व भ्रम यांजकडून
ग्रासला जात नाहीं; व अज्ञानामुळें मनांत खेदही बाळगीत नाहीं;

पैं मोहाचां अवसरीं । ज्ञानाची चाड न धरी ।
ज्ञानी कर्मे नादरीं । होतां ना दुःखी ॥ ३२९ ॥

जो मोहप्रसंगांत ज्ञानाकरितां हपापत नाहीं, त्याचप्रमाणें, ज्ञानवान
झाला असतां कर्मे टाकीत नाहीं व त्यांपासून दुःखही मानीत नाहीं.

सायंप्रातमध्यान्हा । येयां तिहीं काळांची गणना ।
नाहिं जेवि तपना । तैसा असे ॥ ३३० ॥

सकाळ, दुपार व सायंकाळ यांची सूर्याला जशी गणना
नसते, त्याप्रमाणे गुणातीत पुरुष निर्विकार असतो,

तेया वेगळें चि काइ प्रकाशे । ज्ञानित्व येयावें असे ।
काइ जळार्णउ पाउसें । साजा होए ॥ ३३१ ॥

त्याला सत्त्वगुणाने काही वेगळा ज्ञानाचा प्रकाश मिळवायचा
असतो का ? काय समुद्राला परिपूर्ण असायला पावसाची गरज आहे ?

नां प्रवर्त्तलेनि कर्मे । कर्मित्व तेया कां गमे ।
सांघें हिमवंतु हिमें । कांपे काइ ॥ ३३२ ॥

अथवा त्या गुणातीत पुरुषाची कर्माकडे प्रवृत्ती झाली तर कर्मठपणा त्याच्या अंगीं
लागेल काय ? अर्जुना, सांग पाहू. हिमालय पर्वत थंडीनें थरथर कांपेल काय ?

नातरि मोहो आलेयां । काइ पां रुसिजैल तेया ।
हां गा आगितें उन्हाळेया । जाळवतसे ॥ ३३३ ॥

अथवा मोह उत्पन्न झाला असतां त्याचें ज्ञान नष्ट होईल
कायं ? उन्हाळ्याकडून महाअग्नी जाळला जाईल काय ?

उदासीनवदासीनो गुणैर्यो न विचाल्यते ।
गुणा वर्तन्त इत्येवं योऽवतिष्ठति नेङ्गते ॥ २३ ॥

उदासीनवत्, आसीन, गुणैः, यः, न, विचाल्यते
गुणाः, वर्तन्ते, इति, एव, यः, अवतिष्ठति, न, इङ्गते

जो साक्षीरूप राहून गुणांकडून विचलित केला जाऊ शकत नाही आणि गुणच गुणांत वावरत
आहेत, असे जाणून तो स्वरूपाचे ठिकाणी स्थिर राहतो. व त्या स्थितीपासून कधी ढळत नाही.

तैसें गुणकार्य हें । आघवें आपण चि आहे ।
ह्मणौनि येकेकें नोहे । ताडातोडि ॥ ३३४ ॥

त्याप्रमाणें गुण व गुणांचें जें कार्य आहे हे सर्व मीच आहे,
म्हणून तो कोणत्याही एका गुणाने विचलित होत नाही.

येवढिया गा प्रतीती । तो देहा आला असे वस्ती ।
वाटे जातां गुंती- । माझि जैसा ॥ ३३५ ॥

वाटसरू जसा मार्गात नांइलाजाने धर्मशाळेत वस्ती करतो तसा
गुणातीत पुरुष एवढ्या अनुभवानें देहामध्ये वस्तीला आलेला असतो.

तो जीणता ना हारवी । तैसा गुण न्हवे ना करवी ।
जैसी कां सोणवी । संग्रामीं तैसा ॥ ३३६ ॥

जशी युद्धाची भूमी हारजितींत भाग घेत नाहीं, त्याप्रमाणें
हा गुणांच्या स्वाधीन होऊन कांहीं कर्मे करीत नाहीं.

आणि गुणाचां यावाजावा । टळे चळे ना पांडवा ।
मृगजळाचा हेलावा । मेरु जैसा ॥ ३३७ ॥

आणि अर्जुना, मृगजळाच्या लोंढ्यानें जसा मेरुपर्वत डळमळत नाहीं,
तसा तो गुणातीत पुरुष गुणांच्या येण्याजाण्यानें गडबडत नाहीं.

हें बहू काइ बोलिजे । व्योमें वारेनि न वचिजे ।
कां सुर्यु न गिळिजे । अंधकारें ॥ ३३८ ॥

हें आंतां अधिक विस्तारानें काय सांगावें ? आकांश जसे वायूच्या लोटांमुळें
आपले स्थान सोडीत नाहीं, अथवा सूर्य जसा अंधाराकडून गिळला जात नाहीं.

स्वप्न गा जेयापरीं । जागतेयातें न सिंतरि ।
गुणिं तैसा अवधारीं । न चळिजे तो ॥ ३३९ ॥

ज्याप्रमाणें जागृतावस्थेंत असलेल्या मनुष्यास स्वप्नभ्रम
होत नाही, तसा ज्ञानवान पुरुष गुणविकारांनीं फसत नाहीं.

गुणा किर नातुडे । परि दूरौनि पाहे जैं कोडें ।
तैं गुण देखे सांघडे । सभ्यु जैसा ॥ ३४० ॥

गुणांनीं तो निश्चयेंकरून आकळला जांत नाही. परंतु तो गुणांचें कमीजास्तपण
पाहतो, जसा एखादा सभ्य गृहस्थ बाहुल्यांचा खेळ तटस्थपणाने अवलोकन करतो,

सत्वधर्म सात्विकीं । रज तें रजोविशेषीं ।
तम मोहादिकीं । वर्त्तत असे ॥ ३४१ ॥

सात्विक गुण सत्कर्मे करतो, रजोगूण विषयांची
आशा करतो, व तमोगुण माहादिक तामसी कर्मे करतो.

परि माझिया सत्ता । इया गुणक्रिया समस्ता ।
हें फुडें जाणे सविता । लौकिका जेवि ॥ ३४२ ॥

परंतु हे गुणांचे वावरणें केवळ या आत्मतत्त्वाच्याच सत्तेनें घडत असतें
त्या प्रमाणें गुणांच्या सर्व क्रिया त्याच्या सत्तेने चालतात, हें तूं पक्कें समज.

समुद्र चि भरति । सोमकांत चि द्रवति ।
कुमुदें पसरति । चंद्रु तो उगा ॥ ३४३ ॥

ज्याप्रमाणे चंद्रामुळेच, समुद्राला भरती येते सोमकांत मण्यास पाझर सुटतो,
व चंद्रविकासी कमळें उमलतात; पण चंद्र तर कांहीं हालचाल करीत नाहीं.

कां वारा चि वाजे वीझे । गगनें निश्चळां असिजें ।
तैसा गुणाचिये गजबजे । डोले ना जो ॥ ३४४ ॥

अरे, वारा सोसाट्याचा वाहो कीं शांत होऊन थबको, पण आकाश
स्थिर असतें; त्या प्रमाणें गुणांच्या हालचालीनें जो गडबडत नाहीं;

अर्जुना येणे लक्षणें । तो गुणातीतु गा जाणणें ।
परिस आतां आचरणें । तेयाचिं तिये ॥ ३४५ ॥

अर्जुना, याप्रमाणें गुणातीताचीं चिन्हें तुला सांगितलीं.
आता त्याची वागणूक, त्याचे वर्तन कसे असते ते ऐक.

समदुःखसुखः स्वस्थः समलोष्टाश्मकाञ्चनः ।
तुल्यप्रियाप्रियो धीरस्तुल्यनिन्दात्मसंस्तुतिः ॥ २४ ॥

सम, दुःख, सुखः, स्वस्थः, समलोष्ट, अश्म, काञ्चनः,
तुल्य, प्रिय, अप्रियः, धीरः, तुल्य, निन्दा, आत्मसंस्तुतिः

जो पुरुष निरंतर आत्मभावात राहून सुख-दुःख समान मानतो, माती, पाषाण आणि सोनें यांना सारखेच
मानतो, व अप्रिय समान मानणारा, आत्मबुद्धी अभंग असलेला, निंदा किंवा स्तुती यांमध्यें समत्व पाहाणारा.

तरि वस्त्रासि पाठीपोटीं । नाहिं सूतवांचूनि किरीटी ।
तैसेनि सुये दीठी । चराचरां ॥ ३४६ ॥

अर्जुना, ज्याप्रमाणैं वस्त्रच्या आंत बाहेर सुतावांचून दुसरें कांहीं नाहीं,
त्या प्रमाणे चराचरासहित सर्व विश्व मद्रूप आहे असें तो पाहतो.

ह्मणौनि सुखदुःखा सरिसें । कांटाळें आचरे ऐसें ।
रिपुभक्तां जैसें । हरिचें देणें ॥ ३४७ ॥

म्हणून, ज्याप्रमाणें ईश्वर आपल्या शत्रूस व भक्तास सारखीच
मुक्ती देतो, तसें तो सुखदुःखांना ताजव्यांत घालून समान मानतो.

यऱ्हविं तऱ्हीं साहाजें । सुखदुःख तैं चि व्यंजे ।
देहजळीं होइजे । मासळी जैसी ॥ ३४८ ॥

जेव्हा जीव देहरूपी जलामध्ये मासोळी होऊन राहतो, तसा जीवानें
देहात विहार केला, कीं तेव्हाच तो अनायासे सुखदःखे भोगतो.

आतां तें तंव तेणें सांडिलें । आहे सस्यरूपे चि मांडिलें ।
सस्यांतीं निचडीलें । बीज जैसें ॥ ३४९ ॥

आतां, देहाभिमान सोडून आपल्या स्वरूपभूत परब्रह्माशी ऐक्य
केले आहे. जसे मळणी झाल्यावर धान्य वेगळें निवडलें जातें,

कां ऊँघू सांडुनि गंगा । रिगाली समुद्राचेया आंगा ।
ते निस्तरे लगबगा । खळाळांची ॥ ३५० ॥

अथवा गंगेच्या पाण्यानें गंगेच्या पात्राला सोडून समुद्राशी ऐक्य पावले,
आता मिळण्यास जाण्याच्या त्वरेमुळे होणारी खळबळ राहिली नाही,

तेवि आपणपे चि जेया । वस्ति जाली गा धनंजया ।
तेया देहीं अपैसेया । सुख तैसें दुःख ॥ ३५१ ॥

त्याप्रमाणे जो स्वतःच्या ठिकाणीच स्थिरचित्त झाला आहे,
त्याच्या देहांत सुखदुःख त्याला न भासतांच आपसूक राहातें.

रात्रि तैसें पाहालें । हें धारणा जेवि एक जालें ।
आत्मारामा देहा आलें । द्वंद्वं तैसें ॥ ३५२ ॥

रात्र किंवा सकाळ हे जसे खांबाला सारखेच असतात, त्याप्रमाणें देहांतील आत्म्यास
सुख व दुःख हीं दोन्हीं सारखींच आहेत. कारण तो गुणांपासून अलिप्त असतो.

पैं निद्रिताचेनि आंगेंसिं । सापुं तैसी उर्वशी ।
तेवि स्वरूपस्था सरिसीं । देहीं द्वंद्वें ॥ ३५३ ॥

ज्या प्रमाणे निजलेल्या पुरुषाच्या शेजारी सापही सारखा आणि उर्वशीही
सारखी. तसा जो स्वरूपस्थ आहे, त्यास देहांत द्वंद्वें सारखीं आहेत.

ह्मणौनि तेयाचां ठांइ । सेणां सोनेयां विशेषु नाहिं ।
रत्ना गुंडेया काहिं । नेणिजे भेदु ॥ ३५४ ॥

म्हणून त्याच्या ठिकाणीं शेण व सोनें यांची सारखीच किंमत आहे,
रत्न आणि पाषाण यांमध्यें भेद आहे, असें तो ओळखत देखील नाहीं.

घरा येऊँ पां स्वर्गु । कां वीरपडो वाघु ।
परि आत्मबुद्धिसंभोगु । विरसु नोहें ॥ ३५५ ॥

स्वर्गसुख त्याच्या घरीं आपण होऊन चालत येवो कीं वाघ त्यावर
उडी घालो परंतु त्याच्या आत्मस्वरूपाच्या बुद्धीस भंग होत नाहीं.

निवटलें नुपहुडे । जळिनलें न विरुढे ।
साम्यबुद्धि न मोडे । तियापरीं ॥ ३५६ ॥

ज्या प्रमाणे मेलेला मनुष्य जागा होत नाहीं अथवा जळलेल्या बीजाला अंकुर
फुटत नाहीं, त्याप्रमाणे ज्ञान्याची ब्रह्मरूप झालेली समबुद्धी कधी विषम होत नाही.

हा ब्रह्मा ऐसेनि स्तुतिजो । कां नीचु ह्मणौनि निंदिजो ।
परि नेणे जळों विझों । राख जैसी ॥ ३५७ ॥

हा ब्रह्मदेव आहे, म्हणून कोणी स्तुती करो, अथवा, नीच, म्हणुन
त्याची निंदा करो, ज्याप्रमाणे राखोंडी जळत नाही किंवा विझत नाही,

तैसा निंदा आणि स्तुती । नैये कोण्ही चि व्यक्ती ।
नाहिं आंधारेया वाती । सूर्या रूप ॥ ३५८ ॥

त्याप्रमाणे निंदा किंवा स्तुती केली असतां त्यापासून कसलचि प्रतिक्रीया
नसते. जसा सूर्याच्या घरीं कधीं अंधार नसतो कीं दिवाही नसतो,

मानापमानयोस्तुल्यस्तुल्यो मित्रारिपक्षयोः ।
सर्वारम्भपरित्यागी गुणातीतः स उच्यते ॥ २५ ॥

मान, अपमानयोः, तुल्यः, तुल्यः, मित्र, अरि, पक्षयोः,
सर्व, आरम्भ, परित्यागी, गुणातीतः, सः, उच्यते

जो मान अपमान सारखेच मानतो, मित्र आणि शत्रु यांविषयीं समत्व जाणतो,
आणि जो कोणत्याही कर्माचा आरंभ करीत नाहीं त्याला गुणातीत असे म्हणावें.

ईश्वरबुद्धि पूजिला । चोरु ह्मणौनि गाजिला ।
वृषगजीं वेढिला । केला राउँ ॥ ३५९ ॥

त्याप्रमाणे कोणी ईश्वर म्हणून पूजन केले किंवा चोर समजून छळ केला बैल
आणि हत्तींनी त्याला घेरलें अथवा नृपाळपद दिलें. तरी तो निर्विकार असतो.

सुहृद पासिं आले । अथवा वैरी वर जाले ।
परि नेणे रात्रि पाहलें । तेज जेवि ॥ ३६० ॥

किंवा याच्याजवळ मित्र जमले अथवा शत्रू अंगावर प्राप्त झाले,
तसे ज्याप्रमाणें सूर्य, अंधारले वा उजाडलें, हे जाणीत नाहीं,

षडरितू येतां आकाशें । लिंपिजे चि ना जैसें ।
तेवि वैषम्य मानसें । जाणिजे चि ना ॥ ३६१ ॥

आकाशावर सहा ऋतु जरी येऊन गेले तरी आकाशाला त्याचा
लेप नसतो तसें याचें मन कधींही विषमतेनें मलीन होत नाहीं,

आणिकु ही येकु पाहीं । आचारु तेयाचां ठांइं ।
तरि व्यापारां नाहीं । जालें दीसे ॥ ३६२ ॥

ज्ञानी पुरुषाच्या ठिकाणी आणखी एक आचरण असते की,
की कर्माचा आरंभ त्याच्या ठिकाणी होतो असे दिसत नाही,

सर्वारंभा उटकलें । प्रवृत्तिचें तेथ मावळे ।
जळति कां कर्मफळें । तें तें चि योजी ॥ ३६३ ॥

संपूर्ण कर्माचा आरंभ नाहीसा झालेला असतो. प्रवृत्तिमार्गापासून दूर राहतो,
त्याच्या कर्माचीं सर्व फळें जळून खाक होतात, तो अग्नि तो गुणातीत पुरुष आहे.

दृष्टादृष्टाचेनि नावें । भाउँ चि जीविं नुगवे ।
सेविजे स्वभावें । पैं तें होये ॥ ३६४ ॥

ऐहिक किंवा पारलौकिक कामनेचा त्याच्या अंन्तःकरणांत उत्पन्न होत
नाहीं. जे जे स्वभावतः समोर सेव्य म्हणून येते ते तो समत्वाने भोगतो.

सुखा ना सीणु नेणे । पाखाणु जेणें मानें ।
तैसी सांडिमांडि मनें । वर्जिली असे ॥ ३६५ ॥

ज्याप्रमाणे दगड सुखी होत नाही किंवा दुःखी होत नाही,
त्या प्रमाणें ज्याच्या मनानें त्याग व स्वीकार टाकलेला असतो,

आतां केती हा चि विस्तारु । जाणे ऐसा आचारु ।
तेयातें तो चि साचारु । गुणातीतु ॥ ३६६ ॥

आतां हा विस्तार पुरे. ज्या पुरुषाचें जसें आचरण
असेल, तोच खरोखर गुणातीत आहे असें समज.

गुणातें अतिक्रमणें । घडे उपायें जेणें ।
तो आतां आइक ह्मणे । कृष्णनाथु ॥ ३६७ ॥

ज्या उपायांनीं गुणांचें उल्लंघन करतां येते, तो उपाय
आता सांगतो, ऐक. असे भगवान श्रीकृष्ण म्हणाले.

| | |
|---|---|
| मां च योऽव्यभिचारेण भक्तियोगेन सेवते । स गुणान्समतीत्यैतान्ब्रह्मभूयाय कल्पते ॥ २६ ॥ | माम्, च, यः, अव्यभिचारेण, भक्तियोगेन, सेवते, सः, गुणान्, समतीत्य, एतान्, ब्रह्मभूयाय, कल्पते |

आणि जो पुरुष अव्यभिचारी भक्तियोगाने मला निरंतर भजतो, तो या गुणांचे उल्लंघन करून गुणातीत व निर्विकल्प ब्रह्मस्वरूप होण्यास पात्र होतो.

| | |
|---|---|
| तरि व्यभिचाररहितें । भक्तियोगें मातें ।<br>सेवी तो गुणातें । जाकळूं सके ॥ ३६८ ॥ | माझ्याहून भिन्न न राहता माझ्याशी ऐक्याने जो माझ्या सगुणस्वरूपाचे ठिकाणी माझी सेवा करतो, तो गुणांना स्वाधीन ठेवू शकतो. |
| परि कोणु मी कैसी भक्ति । व्यभिचारा काइ व्यक्ति ।<br>हे आघवी चि निरुति । होआवी लागे ॥ ३६९ ॥ | तर मी कोण, माझी भक्ति कशी करावयाची, अव्यभिचार म्हणजे काय, या गोष्टींचें विवेचन करणें अवश्य दिसतें. |
| तरि पार्था परियसां । मीं तंव एथ ऐसा ।<br>रत्नीं किळाऊँ जैसा । रत्न चि तो ॥ ३७० ॥ | तरी अर्जुना ! ऐक, मी तर या विश्वांत असा आहें कीं, ज्या प्रमाणें रत्नावरील तेज जसे रत्नच होय, |
| कां द्रवपण चि नीर । अवकाशू चि अंबर ।<br>गोडी ते चि साकर । दोनि नाहिं ॥ ३७१ ॥ | अथवा पातळपणा व पाणी, अवकाश व आकाश, आणि गोडीहून साखर निराळी नसते, गोडी हीच साखर होय. |
| वन्हि ते चि जाळ । दळा चि नांव कमळ ।<br>रूंखु ते चि डाहाळ- । फळांदिक ॥ ३७२ ॥ | अग्नी म्हणजेच ज्वाळा. कमळाच्यां पाकळ्या हेंच कमळ, वृक्ष तोच जसें फांद्या, फळें वगैरे आहे. |
| आगा हिंव आलिखलें । तें हिमवंतु जेवि जालें ।<br>नाना दूध मुरालें । दध्याकारें ॥ ३७३ ॥ | ज्याप्रमाणें थंडी व ज्या ठिकाणीं थंडी वास करते तो हिमालय पर्वत व दूध विरजलें म्हणजे ज्याप्रमाणें त्यालाच दही म्हणतात. |
| तैसें विश्व एणें नावें । हें मीं चि पैं आघवें ।<br>आतां चंद्रबिंब सोलावें । न लगे जेवि ॥ ३७४ ॥ | तसे विश्व या नावाने हे सर्व आहे ते मीच आहे. चंद्राची कला पाहणें झाल्यास ती जशी चंद्रापासून सोलून काढावी लागत नाही, |
| घृताचें थिनलेपण । न मोडितां घृत चि जाण ।<br>कां नाटितां कांकण । सोनें चि तें ॥ ३७५ ॥ | तूप जरी थिजलें, तरी त्या स्थितींतही तें तूपच असते किंवा नग जरी अटविला नाहीं तरी तें जसें सोनेंच, |
| नुकलितां पटु । तंतू चि आहे स्पष्टु ।<br>नवा विरचता घटु । पृथ्वी न्हवे ॥ ३७६ ॥ | वस्त्र जरी उसविलें नाहीं तरी तें जसें तंतुरूपच असतें. घट जरी विरचिला नाहीं तरी तो जसा मातीच, |

ह्मणौनि विश्वपण जावें । मग मातें घेयावें ।
तैसा न्हवे आघवें । सकट चि मीं ॥ ३७७ ॥

म्हणून पहिल्या प्रथम ही विश्वभावना नष्ट झाली पाहिजे आणि मग माझे स्वरूप
ग्रहण करावे अशी आवश्यकता नसून, विश्वासकटच मला जाणलें पाहिजे.

ऐसेनि मातें जाणिजे । तैं जाणीवभक्ति ह्मणिजे ।
एथ भेदु काहिं देखिजे । व्यभिचारु तो ॥ ३७८ ॥

एशा रीतीचें माझें ज्ञान होणें म्हणजेच माझी अव्यभिचारी भक्ती. तेथे
थोडा जरी दुजाभाव, मनात आला तरी तो भक्तीचा व्यभिचार घडला.

येयाकारणें भेदातें । सांडूनि अखंडे चित्तें ।
आपणेयां सकट मातें । जांणावें गा ॥ ३७९ ॥

म्हणूनच आपल्याहून मला भिन्न न पाहता,
एकनिष्ठ चित्तानें तू आपल्यासह मला जाणावें.

पार्था सोनेयां टीक । सोनां चि लागली देख ।
तैसें आपणपें आणिक । मानावें ना ॥ ३८० ॥

हे अर्जुना ! सोन्याला लावलेली सोन्याची टिकली तर त्यांत भिन्नता असूंच
शकत नाही. त्याप्रमाणें आपल्यापासून विश्व वेगळें आहे असें समजूं नको.

तेजाचा तेजौनि निगाला । परि तेजीं असे लागला ।
तेया रश्मी ऐसा भला । बोधु होआवा ॥ ३८१ ॥

तेजापासून निघालेले तेजाचे किरण ज्याप्रमाणे तेजाचे ठिकाणीच असतात, त्या किरणां
सारखा चांगला बोध असावा; म्हणजे तूं आंपल्याला माझ्याहून भिन्न समजूं नकोस.

पैं परिमांणु भूतळीं । हिमकणु हिमाचळीं ।
मजमाझि निहाळीं । आहे तैसें ॥ ३८२ ॥

पृथ्वीवर असलेला अल्प परमाणू जसा पृथ्वीरूप आहे आणि हिमालयावरील हिमकण
हिमालययाहून निराळें नाहींत, त्याप्रमाणें माझ्या ठिकाणीं सर्व विश्व आहे असें जाण.

हो कां तरंगु लाहानु । परि सिंधुसिं नाहिं भिन्नु ।
तैसा ईश्वरीं मीं आनु । नोहें चि नां ॥ ३८३ ॥

समुद्रावर उठलेला तरंग लहान असला तरी तो समुद्राहून वेगळा
नाहीं; त्याप्रमाणे मी परमेश्वराहून निराळा नाही, असे पाहा.

ऐसेनि गा समरसें । दृष्टि जैं उल्हासे ।
ते पैं भक्ति ऐसें । आह्मी ह्मणों ॥ ३८४ ॥

बा अर्जुना, अशा ऐक्यानें जेव्हां दृष्टी विकसित होते,
तेव्हाच ती खरी भक्ती असे आमचे म्हणणे आहे.

आणि ज्ञानाचें चांगावें । इये चि दृष्टी नावें ।
योगाचें हिं आघवें । सर्वस्व हें ॥ ३८५ ॥

आणि या दृष्टीने ज्ञानमार्ग आम्ही सर्वांत उत्तम
असें समजतों आणि योगाचें सर्व सार हेंच आहे.

सिंधू आणि जळधारा- । माझि लागलिया जेवि धारा ।
तैसी वृत्ति वीरा । प्रवर्त्ते ते ॥ ३८६ ॥

समुद्र आणि मेघ यांच्यामध्यें अखंडपणे राहावा तशी त्या भक्ताची वृत्ती
अखंड मज कडेच लागलेली असते. त्याचे स्वर्वस्व भगवंतच असतो.

कां कुहेंसिं आकाशा । तोंडिं सांदा नाहिं जैसा ।
तो परमरसु तैसा । एकवटे ॥ ३८७ ॥

अरे, विहिरीचें तोंड व आकाश यांचा जसा सांधा बसवलेला नसतो, तसा
जो आपल्यांत व आत्मस्वरूपांत भेद न मानतां ऐक्य आहे असें जाणतो.

पैं प्रतिबिंबौनि बिंबवेरीं । प्रभेची जैसी उजिरी ।
ते सोहंवृत्ति अवधारीं । तैसी होये ॥ ३८८ ॥

प्रतिबिंबापासून बिंबापर्यंत ज्याप्रमाणे एक प्रकाशच प्रकट असतो, तशीच
ही सोंऽहं वृत्ती जीवात्म्यापासून परमात्म्यापर्यंत सलग पोंचलेली आहे

ऐसनि मग परस्परें । ते सोहंदृष्टि जैं अवतरे ।
तैं तिये ही सकट सरे । आपैसेया ॥ ३८९ ॥

मग अशा रीतीची ही सोऽहं वृत्ती एकदा बनली, तेव्हा
तो त्या वृत्तीसकट स्वतःही माझ्यात विलय पावतो.

जैसा सैंधवाचा रवा । सिंधूमाझि पांडवा ।
विरालेयां विरावा । हें इ ठाके ॥ ३९० ॥

हे पांडवा, ज्याप्रमाणे मिठाचा खडा समुद्रांत टाकला
असतां तो आपोआप विरतो, त्याला विरवावे लागत नाही,

नातरि जाळूनि तृण । वन्हि विझे आपण ।
तैसें भेदु नासुनि जाण । ज्ञान घडे ॥ ३९१ ॥

किंवा गवाताला जाळल्यावर जसा अग्नीही स्वतः विझून जातो, त्याप्रमाणें
ज्या ज्ञाना पासून ब्रह्माचे ऐक्य होतें, ते ज्ञानही मागून नाहींसें होतें.

माझें पैलपण जाये । भक्तु हें अइल ठाए ।
अनादि ऐक्य जें आहे । तें चि निवडे ॥ ३९२ ॥

मी मायेच्या पलीकडे आहें व भक्त मायेच्या अलीकडे आहे असा भास
नाहींसा होऊन, मूळचे जाणविरहित जे ऐक्य तेच तो होऊन राहतो.

आतां गुणातीतु तें किरीटी । जाण इया न्हवति गोठी ।
जें एकपणा ही मीठी । पडों सरलीं ॥ ३९३ ॥

हे किरीटी, अशी स्थिति प्राप्त झाल्यावर आतां तो गुणांला जिंकतो,
ही भाषाचराहत नाहीं; कारण गुणाला जिंकण्याची गोष्ट उरत नाही.

किबंहुना ऐसी दशा । तें ब्रह्मत्व गा सुदंसा ।
हें तो पावे जो ऐसा । मातें भजे ॥ ३९४ ॥

बहु काय सांगावें ? अशा प्रकारची अवस्था तें, हे मर्मज्ञ अर्जुना,
ब्रह्मत्व होय. मला जो अव्यभिचारें भजतो, त्याला हें प्राप्त होतें.

पुडुतीं इहीं लिंगी । भक्तु जो माझा जगीं ।
हे ब्रह्मता तेयालागि । प्रतिव्रता ॥ ३९५ ॥

शिवाय, आणखी या लक्षणांनीं युक्त असा माझा भक्त या
जगात वावरतो त्याची ब्रह्मता ही पतिव्रता स्त्री होऊन राहते.

जैसें गंगेचेनि ॐघें । ढळमळीत जें निगे ।
सिंधुपद तेया जोगें । आन नाहीं ॥ ३९६ ॥

ज्या प्रमाणें गंगेच्या प्रवाहानें खळखळ वाहणारें पाणी
जें निघतें, त्याला सागराशिवाय दुसरे योग्य स्थान नाहीं,

तैसा ज्ञानाचिये दीठी । जो मातें सेवी किरीटी ।
इये ब्रह्मतेचां मुगुटीं । चूडारत्न तो ॥ ३९७ ॥

त्याप्रमाणें अर्जुना, ज्ञानाच्या दृष्टीनें जो माझी सेवा
करतो, तो ब्रह्मतारूप मुकूटावरील मुख्य मणि होय.

येया ब्रह्मत्वासी चि पार्था । सायुज्य ऐसी व्यवस्था ।
येया चि नांव चौथा । पुरुषार्थु गा ॥ ३९८ ॥

पार्था, या ब्रह्मप्रातीला सायुज्य मुक्ती असे नाव
आहे आणि चतुर्थ पुरुषार्थ जो मोक्ष तो हाच आहे.

परि माझें आराधन । ब्रह्मत्वीं होये सोपान ।
येथ मीं हान साधन । गमैल हें ॥ ३९९ ॥

परंतु माझी भक्ती ही ब्रह्मस्थितीच्या ठिकाणीं साधन आहे. किंवा ब्रह्मप्राप्तीची पहिली पायरी आहे. म्हणून ब्रह्मत्वीं पोंचण्याचें मी साधन आहें,

तरि ज्ञनें ऐसें । तूझां चित्तीं प्रवेशे ।
पैं ब्रह्म आन असे । मींवांचूनि ॥ ४०० ॥

असे तुला वाटेल व माझ्यापेक्षा ब्रह्मत्व काहीतरी वेगळे आहे म्हणून सांगतों, कीं, ब्रह्म हें मी पासून मुळींच भिन्न नाहीं.

ब्रह्मणो हि प्रतिष्ठाहममृतस्याव्ययस्य च ।
शाश्वतस्य च धर्मस्य सुखस्यैकान्तिकस्य च ॥ २७ ॥

ब्रह्मणः, हि, प्रतिष्ठा, अहम्, अमृतस्य, अव्ययस्य, च,
शाश्वतस्य, च, धर्मस्य, सुखस्य, एकान्तिकस्य, च

कारण त्या अविनाशी परब्रह्माचा, अमृताचा, नित्य
धर्माचा व अखंड अशा सुखाचें स्थान मी आहें.

पैं मंडळ आणि चंद्रमा । दोनि न्हवति सुवर्मा ।
तैसा मज आणि ब्रह्मा । भेदु नाहीं ॥ ४०१ ॥

चंद्र आंणि चंद्राचें बिंब हीं जशी भिन्न नाहींत, त्याप्रमाणें, हे मर्मज्ञ अर्जुना, मी व ब्रह्म यांत गुणमात्रही भेद नाहीं.

आगा नित्य जें निष्कंप । अनव्रत धर्मरूप ।
सुख जें उमप । अद्वैत जें ॥ ४०२ ॥

जे परब्रह्म नित्य आहे, अविकारी आहे, कशानेही झाकले गेले नाही जे धर्माचे निखळ, उघडे रूप आहे, जे अद्वितीय आहे व जे सर्वोत्तम आनंदरूपच आहे;

विवेकु आपुलें काम । सांडूनि ठाकिजे धाम ।
तें निकर्षाचें निःसीम । किंबहुना मीं ॥ ४०३ ॥

विवेकवृत्ती आपले काम करून शेवटी जेथे स्थिर होते. तें स्थान मी आहें. फार काय सांगावें ! ते निष्कर्षाचे, सिद्धान्ताचे अमर्याद स्थान मीच आहे.

ऐसें ऐसें हें अवधारां । अनन्याचा तो सोयरा ।
सांघतसे धनुर्द्धरा । पार्थासि ॥ ४०४ ॥

एकनिष्ठ भक्तांचा जो आवडता परमात्मा, भगवान् श्रीकृष्ण अर्जुनास सांगत होते.

तेथ घृतराष्ट ह्मणे । संजया हें तूतें कवणें ।
पूसिलें पैं वायाणें । कां गा बोलिलासि ॥ ४०५ ॥

हें ऐकून राजा धृतराष्ट्र म्हणांला, संजया, हें तुला कोणीं विचारलें होते जे विचारले नाही ते का व्यर्थ सांगतोस ?

माझी अवसरचिंता फेडी । सांघे विजयाची गुढी ।
तंव येरु ह्मणे सांडी । हे गोठी आतां ॥ ४०६ ॥

पुत्रांच्या विजयाची वार्ता सांगून माझीं शंका तूं फेड, तेव्हां संजय मनीं म्हणाला, कीं पुत्रविजयाच्या गोष्टी तूं कशाला पुसतोस ?

संजया विस्मयो मानसीं । मग आहा करुनि स्वशरीरेंसि ।
ह्मणे कैसा पैं देवेसीं । द्वेषु एया ॥ ४०७ ॥

धृतराष्ट्राच्या बागण्याचें संजयाला फारच नवल वाटलें, तो आपल्याशींच उद्गारला, दैवगति काय विचित्र आहे. याचे देवाशी कसे वैर आहे, पहा.

तऱ्हीं कृपाळु तो तुष्टो । विवेकु यया घोंटो ।
मोहाचा फीटो । महारोगु ॥ ४०८ ॥

तरी कृपाळू भगवान संतुष्ट होऊन कृपा करो, त्याला विवेक कृपा करो, याचा मोहरूपी महारोग नाहींसा होवो.

संजया ऐसें चिंतितां । संवादु तो चि भावितां ।
हर्षाचा येंतु चित्ता । महापूरु ॥ ४०९ ॥

संजय अशा प्रकारें मनांत विचार करतो आहे, आणि कृष्णार्जुनांच्या संवादाचे मनन करीत असतां, त्याच्या चित्तांत आनंदाचा महापूर आला.

ह्मणौनि आतां तेणें । उत्साहाचेनि अवतरणें ।
श्रीकृष्णाचें बोलणें । सांघिजैल तेया ॥ ४१० ॥

म्हणून आतां या उत्साहाच्या भरांत तो पुढे भगवान काय बोलले ते सांगणार आहे.

तेयां अक्षरांआंतूलु भाऊँ । पाववीन मी तुमचा ठाऊँ ।
आइकां ह्मणे ज्ञानदेऊँ । निवृत्तिचा ॥ ४११ ॥

श्रीनिवृत्तिनाथाचे श्रीज्ञानेश्वर महाराज श्रोत्यांना म्हणतात, भगवंताच्या या भाषणांतील शब्दांचा भावार्थ मी तुमच्या चित्तास पटवीन तो तुम्ही ऐका.

**ॐतत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रें**
**श्रीकृष्णार्जुनसंवादे गुणत्रयविभागयोगो नाम चतुर्दशोऽध्यायः**

# सार्थ ज्ञानेश्वरी
## अध्याय पंधरावा

आतां हृदय हें आपुलें । चौफळौनि भलें ।
वरि बैसउं पाउलें । श्रीगुरुचीं ॥ १ ॥

आता आपल्या हृदयाचा चौरंग करून
त्यावर श्रीगुरूंच्या पावलांची स्थापना करू.

ऐक्यभावाची आजुंळि । सर्वेंद्रियकुड्मळिं ।
वरि भरुनि पुष्पांजळी । अर्घ्यु देउँ ॥ २ ॥

नंतर एकनिष्ठपणाच्या ओंजळींत सर्व इंद्रियें हींच किंचित्
उमललेलीं फुलें त्या चरणाचे ठिकाणीच अनन्य, भावे समर्पण करू.

अनन्योदकधुवट । वासना जे तन्निष्ट ।
तें लागलेंसे अबोट । चंदनाचें ॥ ३ ॥

अनन्यभक्तीच्या स्वच्छ जलाने त्यांना स्नान घालून श्रीगुरूंच्या विषयीं असलेली
वासना,  हेच सुवासिक चंदनाचे बोट, मी त्या चरणाचे ठिकाणी लाविले आहे.

प्रेमाचेनि भांगारें । निर्वाळूनि नेपुरें ।
लेवउं सुकुमारें । पदें तियें ॥ ४ ॥

निर्मळ प्रेमरूपी चोख सोन्याच्या घागऱ्या करून
गुरूंच्या सद्‌गुरूंच्या सुकुमार पायांत घालू.

घनावलि आवडी । अव्यभिचारें चोखडीं ।
तियें घालूं जोडीं । आंगुळियां ॥ ५ ॥

गुरूंच्या ठिकाणीं असलेल्या एकनिष्ठ व दृढ भक्ती, हीच
कोणी रणजोडवीं, तीं त्या चरणांच्या आंगठ्यांत लेववूं.

आनंदमोदबहळ । सात्विकाचें मुकुळ ।
तें उमळलें अष्टदळ । ठेउं वरि ॥ ६ ॥

आनंदसरूपी सुवासपूर्ण भरलेली अष्ट सात्त्विक भावाची उमललेली
कमळकळी, हेच कोणी अष्टदळात्मक कमळ तें सद्‌गुरूंच्या पायांवर वाहू.

तेथ अहंधूपु जाळूं । नाहंतेजें ओंवाळूं ।
सामरस्य पोटाळूं । निरंतर ॥ ७ ॥

अहंकाररूपी धूप जाळून व निरहंकार वृत्तीच्या तेजाने धूपदीप ओवाळूनि
आणि श्रीगुरुशी समरस होऊन श्रीगुरुचे चरण पोटाशी कवटाळुन धरीन

माझी तनु आणि प्राण । इया दोन्ही पाउवां लेवउं श्रीचरण ।
करूं भोगमोक्षीं निंबोलण । पायां तेयां ॥ ८ ॥

माझे शरीर व प्रांण यांच्या पादुका करून श्रीगुरूच्या चरणांत
घालू; व गुरूंच्या चरणांवरून भोग व मोक्ष यांचें लिंबलोण करू.

इया गुरुचरणसेवा । हों पात्र तेया दैवा ।
जें सकळार्थाचा मेळावा । पाटु बांधों ॥ ९ ॥

ज्याच्या योगाने धर्म, अर्थ, काम व मोक्ष या संपूर्ण पुरुषार्थाच्या सिंहासनावर
राज्या भिषेक होतो, त्या भाग्यास श्रीगुरुचरणांच्या सवेनें आम्ही पात्र होऊं.

ब्रह्मिचें विसरणेंवेऱ्हीं । उन्मेखु लाहे उजरि ।
जें वाचेतें इये करि । सुधासिंधु ॥ १० ॥

ज्या दैवयोगें ब्रह्मस्थिति लाभेपर्यंत ज्ञान उत्कर्ष पावते, ज्या
सद्भाग्याने वाणी अमृताच्या सागरासारखी गोडी व संजीवता येते

पूर्णचंद्राचां कोडी । वक्तृत्वा घापे कुरौंडी ।
तैसी आणी गोडी । आक्षरांतें ॥ ११ ॥

कोट्यावधि पूर्णचंद्र ज्यां वक्तृत्वावरून ओंवाळुन टाकावे,
अशा प्रकारची गोडी प्रत्येक अक्षरांच्या अंगी असावी